सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर गुरूवार, दि. १४ ऑगस्ट २०२५ वर्ष - तिसरे अंक १३३ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## राज्यातील १५ सरपंच स्वातंत्र्यदिनी दिल्लीत विशेष पाहुणे म्हणून उपस्थित राहणार; ९ महिला सरपंचांचा समावेश

नवी दिल्ली : राजधानी दिल्ली येथे लाल किल्ल्यावर १५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या ७९ व्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यासाठी देशभरातील २८ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील २१० ग्रामपंचायत सरपंचांना विशेष पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे. यामध्ये महाराष्ट्रातील एकूण १५ सरपंचांचा समावेश असून यात ९ महिला सरपंच आहेत. १५ ऑगस्ट रोजी हे सर्व सरपंच लाल किल्ल्यावरील स्वातंत्र्यदिन सोहळ्यास उपस्थित राहून या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार ठरणार आहेत.



केंद्र सरकारच्या पंचायती राज विभागाकडून या सर्व सरपंचांचा विशेष सन्मान होणार आहे. या सरपंचांनी आपल्या गावांमध्ये पायाभूत सुविधा, सार्वजनिक सेवा आणि सर्वसमावेशक उपक्रमांमध्ये उल्लेखनीय सुधारणा घडवल्या आहेत. 'हर घर जल', 'प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण', 'मिशन इंद्रधनुष' यांसारख्या केंद्र सरकारच्या योजनांचे शंभर टक्के प्रभावी कार्यान्वयन करताना स्थानिक गरजांनुसार नवीन उपक्रमही राबवले आहेत.

महाराष्ट्रातून निवड झालेले ग्रामपंचायत सरपंच पुढीलप्रमाणे : श्री. प्रमोद नरहरी लोंढे (लोंढेवाडी, ता. माढा, जि. सोलापूर), श्रीमती जयश्री धनंजय इंगोले (खासळा नाका, ता. कामठी, जि. नागपूर), श्री. संदीप पांडुरंग ढेरंगे (कोरेगाव भीमा, ता. शिरूर, जि. पुणे), श्रीमती डॉ. अनुप्रिता सचिन भांडे (म्हातोडी, ता. अकोला, जि. अकोला), श्रीमती नयना अशोक भुसारे (भावसे, ता. शहापूर, जि. ठाणे), श्रीमती सुनिता दत्तात्रय मिटकरी (ढोरखेडा, ता. मालेगाव, जि. वाशिम), श्रीमती अपर्णा नितीन राऊत (कोंढाळा, ता. देसाईगंज, जि. गडचिरोली), श्रीमती संजीवनी वैजनाथ पाटील (खर्डा, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर), श्री. चंद्रकुमार काशीराम बहेकार (भेजपार, ता. सालेकसा, जि. गोंदिया), श्रीमती रोमिला रामेश्वर बिसेन (केसलवाढा/पवार, ता. लाखनी, जि. भंडारा), श्री. सूरज संतोष चव्हाण (चिंचाळी, ता. दापोली, जि. रत्नागिरी), श्रीमती पार्वती शेषराव हरकल (कुंभारी, ता. जिंतूर, जि. परभणी), श्री. प्रमोद किसन जगदाळे (बिदल, ता. मान, जि. सातारा), श्री. शशिकांत माधवराव मांगले (कसबेगव्हाण, ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती), श्रीमती प्रभावती राजकुमार बिराजदार (बामणी, ता. उदगीर, जि. लातूर) असे एकूण १५ सरपंच आहेत.

गुरुवारी १४ ऑगस्ट रोजी या विशेष अतिथींचा औपचारिक सत्कार होणार असून, यावेळी केंद्रीय पंचायती राज मंत्री राजीव रंजन सिंह उर्फ ललन सिंह, केंद्रीय राज्य मंत्री प्रा. एस. पी. सिंह बघेल आणि मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. आत्मनिर्भर पंचायत, विकसित भारताची ओळख या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमात कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित 'सभा सार' ॲप लाँच होणार असून, 'ग्रामोदय संकल्प' मासिकाचा १६ वा अंक प्रकाशित केला जाणार आहे.

## 'ग्लोबल गणेश फेस्टिवल २०२५'च्या अध्यक्षपदी एकनाथ शिंदे, स्वागताध्यक्षपदी चंद्रकांत पाटील



पुणे: गौरवशाली परंपरा असलेल्या पुण्याचा गणेशोत्सवाला आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक व्यापक करण्यासाठी ग्लोबल गणेश फेस्टिवलचे आयोजन केले आहे. यंदा फेस्टिवलचे दुसरे वर्ष आहे. फेस्टिवलच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यकारिणी घोषित करण्यात आली आहे. ग्लोबल गणेश फेस्टिव्हल २०२५ च्या अध्यक्षस्थानी यंदा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची, स्वागताध्यक्षपदी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची, तर 'मार्गदर्शन समिती'च्या प्रमुखपदी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर ट्रस्टचे खजिनदार महेश सूर्यवंशी यांची निवड करण्यात आली आहे. ग्लोबल गणेश फेस्टिव्हल २०२५ चे कार्यकारी अध्यक्ष वैभव वाघ यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी फेस्टिव्हलचे मुख्य समन्वयक अनिरुद्ध येवले, आंतरराष्ट्रीय समन्वयक धनश्री पाटील, समन्वयक महेश साने, कार्यकारी अधिकारी ऋषिकेश कायत, प्रसिद्धीप्रमुख जीवराज चोले, सांस्कृतिक प्रमुख प्रणव भुरे आदी उपस्थित होते.

वैभव वाघ म्हणाले, पुण्याच्या सार्वजनिक गणेशोत्सवात देशविदेशातून येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढावी, गणेशोत्सव आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक व्यापक पद्धतीने जावा, यासाठी पुण्यातील गणेशोत्सव आयोजनात अग्रस्थानी असलेल्या कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून गेल्यावर्षीपासून या फेस्टिवलचे आयोजन केले जात आहे. जागतिक गणेश मंडळे व पुण्यातील गणेश मंडळांचा सामंजस्य करार घडवून आणण्यावर भर दिला जाणार आहे. यानिमित्ताने जागतिक स्तरावर विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन केले जाणार आहे. धार्मिक पर्यटन विकसित करण्यासाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा उभारण्याची गरज आहे. 'मोरया हेल्पलाईन'द्वारे परदेशातून येणाऱ्या पर्यटकांना धार्मिक स्थळांना भेटी देण्यासाठी सहकार्य केले जात आहे.

यंदा या फेस्टिवलला राज्याच्या पर्यटन विभागाचे सहकार्य लाभले आहे. जगातील अनेक महोत्सवांपेक्षा गणेशोत्सव हा अधिक व्यापक व भव्यदिव्य स्वरूपाचा आहे. परंतु, या उत्सवाला म्हणावी तशी जागतिक स्तरावर ओळख मिळाली नाही.

## तुळजाभवानी मंदिरात तणाव: आव्हाड समर्थकांनी सुरक्षा रक्षकांशी धक्काबुक्की केल्याचा आरोप


तुळजापूर: तुळजाभवानी मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या कामावरून सुरू असलेल्या वादामुळे तुळजापूरमध्ये राजकीय वातावरण तापले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी मंदिरात भेट दिल्यानंतर येथे मोठा तणाव निर्माण झाला. मंदिराच्या आवारात सुरक्षा रक्षक आणि आव्हाड यांच्या समर्थकांमध्ये धक्काबुक्की झाल्याची माहिती समोर आली आहे.

मंदिराचा जीर्णोद्धार करताना मंदिराचे शिखर उतरवण्यास आमदार आव्हाड यांनी विरोध दर्शवला आहे. या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी ते थेट तुळजापूर येथे दाखल झाले. त्यांनी देवीचे दर्शन घेतल्यानंतर जीर्णोद्धार कामाची पाहणी केली. त्याचवेळी, मंदिराबाहेर भाजपचे कार्यकर्ते कमालीचे आक्रमक झाले. 'मुंब्राच्या आमदाराने येथे येण्याचे काय कारण?' असा सवाल करत त्यांनी आव्हाड यांच्या वक्तव्याचा तीव्र निषेध केला. भाजप कार्यकर्त्यांनी रास्ता रोको करून आव्हाड यांची गाडी थांबवण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे परिसरात मोठा गोंधळ निर्माण झाला होता.

याचवेळी, आव्हाड यांना मंदिरात सोडल्यानंतर त्यांच्या समर्थकांनीही मंदिरात प्रवेश करण्यासाठी गर्दी केली. त्यामुळे सुरक्षा रक्षक आणि कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक वाद झाले आणि नंतर धक्काबुक्कीही झाली. या गोंधळामुळे दर्शनासाठी आलेल्या भाविकांना नाहक त्रास सहन करावा लागला. त्यांना बराच वेळ दर्शनाच्या रांगेत थांबावे लागले.

यादरम्यान, भाजप कार्यकर्त्यांनी आव्हाड यांच्या गाडीसमोर ठिय्या मांडून जोरदार घोषणाबाजी केली. 'आव्हाड यांनी हिंदूंच्या भावना दुखावल्या असून, त्यांनी माफी मागावी,' अशी मागणी कार्यकर्त्यांनी केली. तुळजाभवानी मंदिराचा कळस काढण्यावरून आव्हाड यांनी वादग्रस्त वक्तव्य केल्याचे भाजप कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. या सर्व प्रकारामुळे मंदिर परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता, ज्यामुळे तणावाचे वातावरण होते.

## सुप्रीम कोर्टाचा सुशील कुमारला झटका; छत्रसाळ स्टेडियम हत्या प्रकरणी जामीन रद्द





नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी ऑलिंपिक पदक विजेता कुस्तीपटू सुशील कुमार याचा जामीन रद्द केला आहे. राष्ट्रीय राजधानीतील छत्रसाळ स्टेडियममध्ये माजी ज्युनियर राष्ट्रीय कुस्ती चॅम्पियन सागर धनखड यांच्या हत्येच्या प्रकरणात हा महत्त्वाचा निर्णय देण्यात आला. न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा यांच्या खंडपीठाने दिल्ली उच्च न्यायालयाने ४ मार्च रोजी सुशील कुमारला दिलेला जामीन रद्द केला. तसेच, सुशील कुमारला एका आठवड्याच्या आत आत्मसमर्पण करण्याचे आदेशही दिले आहेत.

या प्रकरणानुसार, मे २०२१ मध्ये कथित मालमत्तेच्या वादातून सुशील कुमार आणि इतरांनी सागर धनखड यांना बेदम मारहाण केली होती. यात सागर धनखड यांचा मृत्यू झाला, तर त्याचे दोन मित्र गंभीर जखमी झाले होते. पोस्टमार्टम अहवालानुसार, सागर धनखड यांच्या डोक्यावर बोथट वस्तूने मार लागल्याने गंभीर मेंदूची इजा झाली आणि त्यातूनच त्यांचा मृत्यू झाला.

दिल्ली उच्च न्यायालयाने छत्रसाळ स्टेडियम हत्याकांड प्रकरणात सुशील कुमार यांना जामीन मंजूर केला होता. मात्र, या निर्णयाविरोधात सागर धनखड यांचे वडील अशोक धनखड यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आणि जामीन रद्द करण्याची मागणी केली. अशोक धनखड यांचा आरोप आहे की सुशील कुमार केवळ गंभीर गुन्ह्याचा आरोपीच नाही, तर यापूर्वीही त्याने प्रकरणातील साक्षीदारांवर दबाव आणला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, आता त्यांच्या कुटुंबावरही तडजोडीसाठी दबाव टाकला जात आहे, ज्यामुळे प्रकरणाची निष्पक्ष सुनावणी होण्यास अडथळा निर्माण होऊ शकतो.

साक्षीदारांच्या सुरक्षेसाठी सुशील कुमारचा जामीन रद्द

सर्वोच्च न्यायालयाने सर्व तथ्ये आणि आरोपांचा सखोल विचार करून दिल्ली उच्च न्यायालयाचा निर्णय पलटवला. न्यायालयाने म्हटले की, इतक्या गंभीर गुन्ह्यातील आरोपीला जामिनावर मुक्त ठेवणे हे तपास प्रक्रियेवर तसेच साक्षीदारांच्या सुरक्षेवर गंभीर धोका ठरू शकते. कायद्याच्या अधीन राहून निष्पक्ष आणि निर्भय सुनावणी सुनिश्चित करणे हीच सर्वोच्च प्राथमिकता आहे. त्यामुळेच सुशील कुमार यांना मिळालेला जामीन रद्द करून त्यांना एका आठवड्यात शरण जाण्याचे आदेश देण्यात आले.

७ दिवसांत आत्मसमर्पण नाही तर अटक निश्चित

आता सुशील कुमार यांच्याकडे केवळ सात दिवसांचा अवधी आहे, ज्यामध्ये त्यांना पोलिसांसमोर आत्मसमर्पण करावे लागणार आहे. जर त्यांनी असे केले नाही, तर त्यांची अटक निश्चित मानली जात आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाने केवळ क्रीडा क्षेत्रातच नव्हे, तर संपूर्ण देशात चर्चा रंगली आहे. या निर्णयामुळे बहुचर्चित छत्रसाल स्टेडियम हत्या प्रकरण पुन्हा एकदा केंद्रस्थानी आले असून, यावर सर्वांचे लक्ष लागले आहे.

## स्वातंत्र्य दिनी मांस विक्री बंदीचा निर्णय राज्य सरकारचा नाहीच! मुख्यमंत्र्यांनी केलं स्पष्ट

### ज्याला जे खायचं ते खात आहेत. आपल्या देशात प्रत्येकाला जगण्याचा अधिकार आहे

मुंबई: राज्यातील अनेक महापालिकांनी १५ ऑगस्टला कत्तलखाने आणि मांस विक्रीची दुकाने बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे राज्यातील राजकारण चांगलंच तापलं आहे. विरोधकांनी या निर्णयावर टिका करणे काही सोडले नाही, पण याबरोबरच सामान्य लोकांनी देखील यावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्या. हा निर्णय राज्य सरकारचा असल्याचा अनेकांचा समज आहे. त्यामुळे या निर्णयासंदर्भात आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली स्पष्ट भूमिका मांडली आहे. त्यांनी स्पष्ट केले की, १५ ऑगस्टला मांस विक्रीची दुकाने बंद ठेवण्याचा निर्णय आम्ही घेतलेलाच हा निर्णय १९८८ रोजी तत्कालीन सरकारच्या काळात घेतलेला असल्याचं त्यांनी सांगितले.

स्वातंत्र्य दिनी कडोंब, मालेगाव सारख्या अनेक महापालिकेने त्यांच्या विभागातील कत्तल खाणे आणि मांस विक्री बंदीचा निर्णय घेतल्याने अनेकजण या निर्णयावर नाराज आहेत. अगदी विरोधक देखील यामुळे राज्य सरकारवर टिकास्त्र सोडत आहेत. मात्र या निर्णयावर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्य सरकारने असा कोणताही निर्णय घेतलेला नाही. १९८८ सालापासूनचा हा निर्णय आहे. १९८८ साली या संदर्भातील जीआर काढण्यात आलेला आहे. सध्या अनेक महापालिकांनी या संदर्भातील निर्णय घेतल्याची माहिती मला नव्हती. मला देखील माध्यमांच्या बातम्यानंतर याची माहिती समजली

सरकारला कोणी काय खावं? हे ठरवण्याची कोणतीही इच्छा नाही

या संदर्भात बोलताना देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, स्वातंत्र्य दिनी मांस विक्री बंदीच्या काही महापालिकांच्या निर्णयाबाबत त्या महापालिकांना मी विचारलं की तुम्ही अशा प्रकारचा निर्णय का घेतला? तेव्हा त्यांनी मला १९८८ चा जीआर पाठवला. त्यांनी मला हे देखील पाठवलं की दरवर्षी अशाप्रकारचा निर्णय ते घेतात. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतानाही अशा प्रकारच्या निर्णयाची प्रत मला काही महापालिकांनी पाठवली. शेवटी सरकारला कोणी काय खावं? हे ठरवण्याची कोणतीही इच्छा नाही, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत.



सध्या आमच्यासमोर अनेक प्रश्न आहेत. त्यामुळे १९८८ साली घेतलेल्या निर्णयावर आता अशा प्रकारचा वादंग तयार केला जात आहे की तो निर्णय जसा आमच्या सरकारने घेतला. काही लोक इथपर्यंत पोहोचले की शाकाहारी खाणाऱ्यांना ते नपुंसक म्हणायला लागले. पण हा मुर्खपणा बंद केला पाहिजे. ज्याला जे खायचं ते खात आहेत. आपल्या देशात प्रत्येकाला जगण्याचा अधिकार आहे. आमच्या सरकारने मांस विक्री बंदीच्या संदर्भातील असा कोणताही निर्णय घेतलेला नाही. हा जुन्या सरकारने घेतलेला निर्णय आहे, असं देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

एखाद्याच्या आहारावर अशा पद्धतीने बंदी घालणे योग्य नाही– अजित पवार

अजित पवार यांनी देखील १५ ऑगस्ट रोजी मांसविक्रीवर बंदीच्या निर्णयावर आपली प्रतिक्रिया व्यक्त केली होती. त्याबद्दल बोलताना ते म्हणाले होते की, जेव्हा श्रद्धेचा प्रश्न असतो तेव्हा अशा प्रकारची बंदी घातली जाते. उदाहरण सांगायचं झाल्यास आषाढी एकादशी किंवा महाशिवरात्र असेल किंवा महावीर जयंती असेल. पण स्वातंत्र्य दिन, देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे होत आहेत. कोकणात साधी भाजी करताना सुकट बोंबील करतात. तो त्यांचा आहार आहे. काही जण त्यांना मांसाहारी म्हणत असले तरी तो त्यांचा वर्षानुवर्षे आहार आहे. मग एखाद्याच्या आहारावर अशा पद्धतीने बंदी घालणे योग्य नाही.

ग्रामीम भागात अनेक ठिकाणी एखादा कार्यक्रम असेल तर बकरा कापतात आणि मग कार्यक्रम साजरा करतात, लोकांना जेवण देतात. मात्र, चिकन–मटणावर स्वातंत्र्य दिनाला कुठे बंदी घालण्यात आली आहे, याची मी माहिती घेतो. मात्र, याबाबत माझं असं मत आहे की, लोकांच्या भावना महत्वाच्या आहेत. भावनेचा आणि श्रद्धेचा प्रश्न जेव्हा येईल तेव्हा त्या विषयांकडे त्या अनुषंगाने पाहिलं पाहिजे, अशी भूमिका अजित पवार यांनी मांडली आहे.

## चीनचे परराष्ट्र मंत्री पुढील आठवड्यात भारत दौऱ्यावर

नवी दिल्ली , १३ ऑगस्ट –डोनाल्ड ट्रम्प यांच्या अमेरिकन प्रशासनाद्वारे ५० टक्के टॅरिफ लागू करण्यात आल्यावर, चीन आणि भारताच्या संबंधांमध्ये अजूनही सौम्यता दिसून येत आहे. याच पार्श्वभूमीवर चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (एनएसए) अजित डोभाल यांची भेट घेण्यासाठी अलीकडेच भारतात येणार आहेत. ही भेट पुढील आठवड्यात होऊ शकते आणि या भेटीदरम्यान दोन्ही पक्ष अनेक महत्त्वाच्या बाबींवर विचारविनिमय करणार आहेत. वांग यी आणि अजित डोभाल हे दोन्ही देशांचे विशेष प्रतिनिधी आहेत, जे भारत–चीन सीमावादासंदर्भातील चर्चेचे नेतृत्व करतात. डोभाल आणि वांग यी यांच्यात भारतात होत असलेली ही बैठक अशा वेळी होत आहे जेव्हा भारताचे चीन आणि रशिया यांच्याशी संबंध झपाट्याने बदलत आहेत. तर भारत आणि चीन यांनी अलीकडच्या काही महिन्यांमध्ये आपले द्विपक्षीय संबंध सुधारण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत.

## राजस्थानमध्ये अपघातात ११ भाविकांचा मृत्यू

जयपूर : राजस्थानमधील दौसा जिल्ह्यात एक दुःखद घटना घडली आहे. खातू श्याम मंदिरातून परतणाऱ्या भाविकांच्या पिकअप ट्रकला भीषण अपघात झाला. या दुर्घटनेमध्ये ७ मुले आणि ४ महिलांसह ११ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. तर अनेक जण जखमी झाले आहेत. जखमींना जयपूर रुग्णालयात उपाचारासाठी पाटवण्यात आले आहे. सर्व मृत भाविक उत्तर प्रदेशातील एटाह जिल्ह्यातील रहिवासी होते आणि खातू श्याम दर्शनासाठी गेले होते.

पिकअप वाहन आणि ट्रेलरच्या धडकेमुळे झालेल्या या अपघातात अनेक जखमींची प्रकृती गंभीर आहे, त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. स्थानिक पोलीस आणि दौसा प्रशासनाने जखमींना जवळच्या आरोग्य केंद्रे आणि रुग्णालयात दाखल केले आहे. दौसा एसपींनी सांगितले की, हा अपघात पहाटे ३:३० ते ४ वाजण्याच्या दरम्यान झाला. सर्व मृत उत्तर प्रदेशातील एटाह जिल्ह्यातील रहिवासी होते.

जिल्हाधिकारी देवेंद्र कुमार म्हणाले की, हे प्रवासी खातू श्यामजी यांना भेटून उत्तर प्रदेशकडे जात होते. त्यांनी सांगितले की, आतापर्यंत ११ जणांच्या मृत्यूची पुष्टी झाली आहे. तर ८ जणांना जयपूर येथे पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले आहे. याशिवाय जिल्हा रुग्णालयात ४ रुग्णांवर उपचार सुरू आहेत. प्रवाशांनी भरलेल्या पिकअप वाहन आणि ट्रेलर यांच्यातील धडकेमुळे हा भीषण अपघात घडला आहे.

मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी सोशल मीडियाच्या माध्यातून एक्सवरुन माहिती दिली की, दौसा येथे झालेल्या भीषण रस्ते अपघातात जीवितहानी झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आहे. जिल्हा प्रशासनाला जखमींवर त्वरित आणि योग्य उपचार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. देव मृत आत्म्यांना आपल्या कमळ चरणी स्थान देवो आणि जखमींच्या प्रकृतीती लवकर सुधारणा होवो.

## भीषण समस्यांच्या निराकरणातूनच पूर्वांचलात संघकार्य - भैयाजी जोशी

### पूर्वांचलात ६४ वर्षे प्रचारक असलेले शशिकांत चौथाईवाले यांचे अभिष्टचिंतन, चौथाईवाले लिखित ' मेरी प्रचारक यात्रा' या पुस्तकाचे इंग्रजी आणि मराठी अनुवादित पुस्तकाचे प्रकाशन

पुणे, दिनांक १२ ऑगस्ट २०२५ : पूर्वांचलातील समस्यांच्या जाणिवेबरोबरच जनजाती समाजात विश्वास निर्माण करण्याचे कार्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रचारकांनी केले. तेथील भीषण समस्यांच्या निराकरणातूनच पूर्वांचलात संघकार्य उभे राहिले, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य भैयाजी जोशी यांनी व्यक्त केले.

पूर्वांचलात ६४ वर्षे प्रचारक असलेले शशिकांत चौथाईवाले लिखित 'माय जर्नी ॲज प्रचारक' (इंग्रजी) आणि 'माझी प्रचारक यात्रा' (मराठी) या अनुवादित पुस्तकांच्या प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. टिळक रस्त्यावरील सर परशुराम महाविद्यालयातील लेडी रमाबाई सभागृहात 'माय होम इंडिया' आणि 'भारतीय विचार साधना' यांच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी भैयाजी जोशी यांच्यासह संघाचे पश्चिम क्षेत्र प्रचारक सुमंतजी आमशेकर,



लेखक शशिकांत चौथाईवाले, भाजपचे माजी राष्ट्रीय सचिव सुनील देवधर, डॉ. विजय चौथाईवाले, भाविसाचे अध्यक्ष डॉ. गिरीश आफळे उपस्थित होते. १४ ऑगस्ट रोजी वयाची ८८ वर्ष पूर्ण करणाऱ्या शशिकांत चौथाईवाले यांचा अभिष्टचिंतन सोहळाही यावेळी पार पडला.

भैयाजी जोशी म्हणाले, उपेक्षा, अपमान आणि असुविधांचा सामना करत वेळप्रसंगी जीवाचेही बलिदान देत संघ प्रचारकांनी पूर्वांचलात काम केले. शाळा, सेवाकार्ये आणि जनजातींच्या प्रश्नांना उत्तरे शोधली. आपल्यातील भेद विसरून एक झाले पाहिजे, हा विचार तेथे रुजवला. त्यामुळे आज आसाममधील अनेक प्रश्न सुटण्याच्या मार्गावर आहेत. झोकून देऊन कार्य करणाऱ्या अशा प्रचारकांच्या पिढीचे प्रतिनिधित्व शशिकांतजी करत आहेत.

संघ कार्याचे यश एका व्यक्तीचे नसून, सामूहिक कार्यपद्धतीचे आहे, असे उद्गार शशिकांत चौथाईवाले यांनी सत्काराला उत्तर देताना काढले. पूर्वांचलातील संघकार्याच्या वाढीबद्दल ते म्हणाले, उग्रवाद जसा कमी होत गेला, तसे पूर्वांचलात संघाचे काम वाढत गेले. सेवाकार्यांमुळे आज सर्व भाषांचे लोक संघाशी जोडले गेले असून, हे संघ कार्यकर्त्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे यश आहे.

आसाममधील ज्या जिल्ह्यात दहशतवाद्यांनी प्रचारकांची हत्या केली, तेथून कार्यकर्ता उभा करत नवीन प्रचारक तयार करण्याचे कार्य शशिकांतजींनी केले आहे, असे गौरवोद्गार सुमंत आमशेकर यांनी काढले. 'माझी प्रचारक यात्रा' हे पूर्वांचलातील संघकार्याचा धांडोळा घेणारे पुस्तक आहे. एकप्रकारे ही पूर्वांचलातील संघयात्राच असल्याचे आमशेकर म्हणाले. पूर्वांचलातील संघकार्याचा खडतर प्रवास आणि शशिकांत चौथाईवाले यांची प्रतिबद्धता, समर्पण आणि धैर्याचा प्रवास सुनील देवधर यांनी उलगडला. अनेक कार्यकर्त्यांमुळे पूर्वांचलात संघ वाढला. त्यांचे जिवंत अनुभव या पुस्तकात असल्याचे डॉ. विजय चौथाईवाले यांनी सांगितले. दिल्लीतील प्रभात प्रकाशनाने पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद प्रकाशित केला आहे. पुस्तकाचा अनुवाद प्रा. शिवशंकर मुजुमदार यांनी केला. कार्यक्रमात अनिल वळचनकर यांनी मानपत्राचे वाचन केले, तर सूत्रसंचालन अभय थिटे यांनी केले.

### राष्ट्रहितार्थ कार्यरत लोक संघाने घडवले

स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाला विसरून केवळ राष्ट्रहितार्थ काम करणारे लोक संघाने घडविल्याचे भैयाजी जोशी यांनी सांगितले. ते म्हणाले, ''विकसित व्हावे अर्पित होऊन जावे, या काव्यपंक्तीला अर्थ प्राप्त करून देणारे अनेक कार्यकर्ते संघाने घडवले. संघाच्या कामावर विश्वास दाखवत पूर्वांचलातील भीषण परिस्थितीत पाऊल टाकण्याचे कार्य प्रचारकांच्या पहिल्या पिढीने केले. मागचा–पुढचा विचार न करता आहे त्या परिस्थितीला तोंड दिले. अशा कंटकाकीर्ण मार्गावरून चालणाऱ्यांमुळेच संघ विस्तारला. संघाने केवळ विचार दिला नाही, तर आचारही दिला. अनुशासनाबरोबरच सत्त्व, सामर्थ्य आणि तपस्या करण्याचे सामर्थ्य स्वयंसेवकांत निर्माण केले. स्वयंसेवक नावाच्या शक्तीशी प्रचारक नावाचा गट उभा केला.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## जेन-झी पिढीच्या म्युच्युअल फंड गुंतवणुकीचा कल उलगडला

मुंबई-या आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने शेअर डॉट मार्केट या फोनपेच्या संपत्ती व्यवस्थापन प्लॅटफॉर्मतर्फे म्युच्युअल फंड्समध्ये भारतातील तरुण गुंतवणूकदारांचा वाढता सहभाग अधोरेखित करण्यात आला. अलीकडेच १ ऑगस्ट २०२४ ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत ६ लाख म्युच्युअल फंड गुंतवणूकदारांचे विश्लेषण करण्यात आले. यातून असे दिसून आले की, ४८% म्युच्युअल फंड गुंतवणूकदार हे १८ ते ३० या वयोगटातील आहेत. यातून गुंतवणुकीकडे आणि दीर्घकालीन संपत्ती निर्मितीकडे तरुणांचा दृष्टिकोन बदलत असल्याचे हे स्पष्टपणे दिसून आले आहे. या आकडेवारीनुसार सुमारे ९५% जेन-झी त्यांचा म्युच्युअल फंडमधील गुंतवणुकीच्या प्रवासाची सुरुवात इक्विटीच्या माध्यमातून करतात. यातून लघुकालीन बचतीचा पर्याय न निवडता जास्त जोखीम घेऊन जास्त परतावा मिळविण्याला त्यांच्याकडून पसंती मिळत असल्याचे दिसून येते.

## 'क्वांटम एन्टँगलमेंट' ब्राइडल कॉउचर कलेक्शनचे अनावरण

मुंबई: आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रशंसित क्युट्युरियर गौरव गुप्ता यांनी ८ ऑगस्ट २०२५ रोजी जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे क्वांटम एन्टँगलमेंट या त्यांच्या इंडियन कॉउचर २०२५ कलेक्शनचे अनावरण केले. लग्नाच्या प्रतिज्ञांच्या पवित्र क्षणासाठी तयार केलेल्या त्यांच्या ब्राइडल कॉउचर लाइनचा हा एक ऐतिहासिक पदार्पण होता. आधुनिक भारतीय लग्नाचे एक तल्लीन करणारे अन्वेषण म्हणून कल्पना केलेल्या या अनुभवाने ५०० हून अधिक पाहुण्यांना तीन परस्पर जोडलेल्या जागांमधून भावनिक प्रवासात नेले: कॉकटेल तासापासून ते प्रतिज्ञा आणि स्वागतापर्यंत, सर्व काही नाट्यमय फॅशन कथाकथनाच्या एकाच संध्याकाळी.क्वांटम एन्टँगलमेंट नावाचा हा संग्रह या तत्त्वावर आधारित होता की दोन कण कायमचे जोडलेले राहतात, जे भारतीय लग्नाच्या विधींच्या भावनिक समक्रमणाचे प्रतिबिंबित करतात. चिवास लक्स कलेक्टिव्ह परफ्यूमसह आधुनिक भारतीय विवाहसोहळ्यात एक धाडसी नवीन अध्याय सुरू करत, गुप्ता यांनी मिरर केलेले सिल्हूट, ड्युअल-टोन पेअरिंग आणि सामायिक आठवणींना उजाळा देणाऱ्या भरतकामाद्वारे त्याचे वेशभूषेत रूपांतर केले.

## स्पायनल मस्क्युलर अट्रॉफी दुर्मिळ आजार

छत्रपती संभाजीनगर - वोक्हार्ट हॉस्पिटल्सचे सिनियर न्यूरॉलॉजिस्ट आणि स्ट्रोक स्पेशालिस्ट डॉ. अमित भट्टी सांगतात, स्पायनल मस्क्युलर अट्रॉफी हा असा आजार आहे ज्यामध्ये वेळ म्हणजेच स्नायूंचे आयुष्य. जितक्या लवकर आपण तो ओळखतो, तितक्या प्रभावीपणे आपण त्याआजारावर नियंत्रण ठेवू शकतो आणि मुलाचे जीवनमान जपू शकतो. उशिरा निदान झाल्यास झालेलं नुकसान भरून काढता येत नाही. म्हणूनच पालक आणि बालरोग तज्ज्ञांनी त्याची लक्षणे ओळखणे खूप महत्त्वाचं आहे.

## न्यू निस्सान मॅग्नाइट साठी 10 वर्षांचा विस्तारित वॉरंटी प्लॅन

अहमदनगर : निस्सान मोटर इंडियाने आज न्यू निस्सान मॅग्नाइटसाठी एक विशेष असा पहिलाच १० वर्षांचा एक्स्टेंडेड वॉरंटी प्लॅन आणला आहे. हा सेगमेंटमधील पहिला ग्राहक-केंद्रित उपक्रम आहे जो ब्रँडची गुणवत्ता, विश्वासार्हता आणि मनःशांती या दीर्घकालीन वचनबद्धतेला अधोरेखित करतो. नवीन निस्सान मॅग्नाइटला एकूण प्रवासी सुरक्षेसाठी ५-स्टार रेटिंग आणि एओपीसाठी (प्रौढ प्रवासी सुरक्षा) ५-स्टार रेटिंग मिळाल्यानंतर ही योजना जाहीर करण्यात आली.या प्लॅनमध्ये ३ वर्षांची मानक वॉरंटी देण्यात आली असून ती १० वर्षांच्या एक्स्टेंडेड वॉरंटी प्लॅनच्या लवचिक प्लॅनद्वारे वाढवता येते. त्यामुळे तुम्हाला फक्त २२ पैसे/किमी किंवा १२ रुपये/दिवस या वाजवी दरात १० वर्षे/२ लाख किमीपर्यंतचा ड्रायव्हिंग आत्मविश्वास आणि संरक्षणाचा संपूर्ण दशकाचा अनुभव मिळतो.

## टोयोटा इनोव्हाने भारतात २० गौरवशाली वर्षे पूर्ण केली

छत्रपती संभाजीनगर : भारतातील आपल्या प्रवासात एक अभिमानास्पद टप्पा गाठत, टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज टोयोटा इनोव्हाची २० उल्लेखनीय वर्षे साजरी केली, हे नाव लाखो भारतीय कुटुंबे आणि व्यवसायांसाठी एक विश्वासार्ह साथीदार बनले आहे. इनोव्हा, इनोव्हा क्रिस्टा आणि इनोव्हा हायक्रॉस या तीन ऑफरमध्ये १२ लाखांहून अधिक युनिट्स विकल्या गेल्याने, हा ब्रँड ग्राहकांच्या अढळ विश्वासाचे आणि चिरस्थायी मूल्याचे प्रतीक म्हणून उभा आहे. गेल्या दोन दशकांमध्ये, इनोव्हा भारतातील ग्राहकांच्या बदलत्या आकांक्षा प्रतिबिंबित करण्यासाठी सतत विकसित झाली आहे, तर टोयोटाच्या गुणवत्ता, टिकाऊपणा आणि विश्वासार्हता या मुख्य तत्वज्ञानात रुजलेली आहे. हा केवळ संख्येचा एक टप्पा नाही तर काळाच्या कसोटीवर उतरलेल्या इनोव्हाने शक्य केलेल्या असंख्य प्रवास, आठवणी आणि क्षणांचा उत्सव आहे.

## वीवो वी६0 मध्ये जीस ऑप्टिक्स, आयकॉनिक डिझाइन

पुणे - जागतिक नाविन्यपूर्ण स्मार्टफोन ब्रँड वीवो ने आज वी६० सादर केले, जे आश्चर्यकारक डिझाइन आणि प्रगत फोटोग्राफीचे एक शक्तिशाली संयोजन आहे. यात १७.२० सेमी (६.७७३) प्रीमियम क्वाड-कर्व्ह डिस्प्ले, अल्ट्रा-कॉम्पॅक्ट कॅमेरा मॉड्यूल आणि भारतीय सांस्कृतिक आकृतिबंधांनी प्रेरित एक आकर्षक रंग पॅलेट आहे. त्याच्या गाभ्यामध्ये वीवोआणि जीसद्वारे संयुक्तपणे तयार केलेली इमेजिंग सिस्टीम आहे ज्यामध्ये फ्लॅगशिप ५०एमपी टेलिफोटो कॅमेरा आणि मल्टीफोकल पोर्ट्रेट मोड आहेत. स्नॅपड्रॅगन ७ जनरल ४ चिपसेट गुळगुळीत आणि प्रतिसाद देणारी कामगिरी सुनिश्चित करते, तर टॉप-ग्रेड आयपी रेटिंग आणि शॉट ड्रॉप-रेझिस्टंट ग्लास त्याला फ्लॅगशिप-लेव्हल टिकाऊपणा देते. एआई फोर सीझन्स पोर्ट्रेट ते एआई स्मार्ट कॉल असिस्टंट पर्यंतच्या स्मार्ट एआईटूल्सची श्रेणी वी६० ला दररोजचे अनुभव स्टायलिश आणि सहज बनवते.

## 'एसबीआय लाईफ - स्मार्ट शील्ड प्लस' एसबीआय लाईफकडून लाँच

पुणे - भारतातील सर्वात विश्वासार्ह खासगी जीवन विमा कंपनी - एसबीआय लाईफ इन्शुरन्सने त्यांची नवीन विमा योजना - एसबीआय लाईफ - स्मार्ट शील्ड प्लसची घोषणा केली. हे वैयक्तिक, नॉन-लिंक्ड, नॉन-पार्टिसिपेटिंग, शुद्ध जोखीम जीवन विमा उत्पादन आजच्या ग्राहकांच्या बदलत्या संरक्षण गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केले आहे. एसबीआय लाईफ - स्मार्ट शील्ड प्लस एक लवचिक आणि स्केलेबल टर्म इन्शुरन्स प्लॅन ऑफर करते जे जीवनातील महत्त्वाच्या टप्प्यांवरील व्यक्तीच्या वाढत्या जबाबदाऱ्यांशी सातत्याने जोडलेले आहे. आपले आणि आपल्या कुटुंबीयांचे भविष्यातील नियोजन अधिक सुलभ आणि अर्थपूर्ण बनवण्यासाठी एसबीआय लाईफ - स्मार्ट शील्ड प्लस हे विचारपूर्वक डिझाइन केलेले आहे.

## आर्थिक आणि ऑपरेशनल कामगिरीचा निकाल जाहीर

नवी दिल्ली : तंत्रज्ञान-आधारित डिजिटल सेवा पुरवणारी कंपनी, बीएलएस ई-सर्व्हिसेस लिमिटेड ने ३० जून २०२५ ला संपलेल्या तिमाहीचे एकत्रित आर्थिक निकाल जाहीर केले. कामगिरी आणि अलीकडच्या घडामोडींविषयी बोलताना, बीएलएस ई-सर्व्हिसेस लिमिटेडचे अध्यक्ष श्री. शिखर अग्रवाल म्हणाले : आर्थिक वर्ष २०२६ ची मजबूत सुरुवात झाल्याचा आम्हाला आनंद आहे. कारण पहिल्या तिमाहीतील कामगिरी आमच्या व्यवसाय मॉडेलची ताकद आणि लवचिकता दाखवते. या तिमाहीत एकूण उत्पन्नात २०५.३% ची लक्षणीय वाढ झाली आहे, जी आमच्या व्यवसायातील चांगली गती आणि ॲडिफिडेलिस सोल्युशन्सच्या एकत्रीकरणामुळे शक्य झाली आहे.



## ज्ञानेश्वर हिरे यांचे निधन

सोयगाव दि.१३ ऑगस्ट - सोयगाव शहरातील नारळीबाग येथील रहिवाशी ज्ञानेश्वर जगन्नाथ हिरे (वय.४९) यांचे दि.१३ बुधवारी सायंकाळी पावणे पाच वाजेच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांचेवर सोयगाव येथील स्मशानभूमीत बुधवारी रात्री साडे दहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात आई,वडील,भाऊ,बहीण,पत्नी,दोन मुले असा परिवार आहे.

# इटोलीत मेंढपाळांमध्ये धुमसता वाद - मारहाणीचे आरोप, चाऱ्याच्या टंचाईवरून कलह तीव्र

जिंतूर प्रतिनिधी - जिंतूर तालुक्यातील इटोली परिसरात शनिवारी (१० ऑगस्ट) सकाळी मेंढपाळांमधील वाद चांगलाच पेटला. बुलढाणा जिल्ह्यातील मेंढपाळ चिमाजी हके आणि स्थानिक मेंढपाळ यांच्यातील शाब्दिक चकमकीनंतर मारहाणीचे आरोप झाले, तर ग्रामस्थांनी हे आरोप फेटाळले. चाऱ्याच्या टंचाई व वनक्षेत्रातील मेंढ्या चरतात यावरून सकाळी १० ते दुपारी ५ वाजेपर्यंत वाद सुरू असल्याचे सांगितले जाते.



**धमक्या, मारहाण आणि खोटे आरोप**

चिमाजी हके यांनी सांगितले की, मी मागील दहा वर्षांपासून येथे मेंढपाळ व्यवसाय करतो. अलीकडे काही मंडळी मला 'इथून निघून जा' अशा धमक्या देत आहेत. माझ्या मेंढ्या पाणी प्यायला बाहेर गेल्या तरी अडवतात आणि वनविभागात चरत असल्याचे खोटे आरोप करतात. आज सकाळी अनेक जण शेताच्या आखाड्यावर धावून आले आणि एका व्यक्तीने मला चापट मारली. मला व माझ्या कुटुंबाला जीविताची भीती आहे.

**दीड हजार मेंढ्यांनी चाऱ्याचा तुटवडा**

स्थानिक मेंढपाळा सोबत आलेले बालाजी सांगळे यांनी सांगितले की, पूर्वी हके यांच्याकडे मोजक्याच मेंढ्या होत्या, आता त्यांच्या व नातेवाइकांच्या मिळून दीड हजारच्या वर मेंढ्या आहेत. त्यामुळे परिसरात चाऱ्याची कमतरता भासत आहे. वनविभागाच्या क्षेत्रात त्यांच्या मेंढ्या चरत असल्याचे व्हिडिओ आमच्याकडे आहेत. त्यांनी ग्रामस्थांना धमक्यांचे खोटे आरोप केले आहेत.

**प्रशासनाचा अभाव - पोलिस व वनविभाग गैरहजर**

घटना सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत सुरू असतानाही ना पोलिस प्रशासनाचा कर्मचारी,अधिकारी घटनास्थळी आला, ना वनविभागाचा वनसेवक.वगळता इतर अधिकारी कर्मचारी दुपारी २ नंतर दोन पोलिस कर्मचारी व वनपाल घटनास्थळी आले. दोन्ही बाजूंनी प्रशासनाने तातडीने तोडगा काढावा, अशी मागणी केली आहे.

**मुक्या जनावरांचा उपास**

वाद संध्याकाळपर्यंत सुरू राहिल्याने मेंढपाळाच्या मेंढ्या दिवसभर उपाशी राहिल्या. बैठक झाल्यानंतरच त्यांना पाणी पिण्यासाठी नेण्यात आले, अशी माहिती मिळाली.

**तोडग्याची शक्यता**

नामदार पालकमंत्री यांच्या जवळचे असलेले भाजप युवा नेते बालाजी सांगळे यांच्या माहितीनुसार, पोलिस बिट जमादार वाघमारे व वनपाल जाधव, थोरवे यांच्या मध्यस्थीने झालेल्या बैठकीत चिमाजी हके यांनी २५ मेंढ्या ठेवून उर्वरित मेंढ्या दुसरीकडे नेण्याचे ठरले. याबाबत अंतिम निर्णयासाठी उद्या सकाळी ११ वाजता पुन्हा बैठक होणार आहे.

# १०२ रुग्णवाहिकेचे चालक दहा महिन्यांपासून वेतनाच्या प्रतिक्षेत; चालकांचा स्वातंत्र्यदिनी सामूहीक आत्मदहनाचा इशारा

परभणी,दि.१३(प्रतिनिधी) : गेल्या पंधरा वर्षांपासून या जिल्ह्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रात इनामे इतबारे सेवा बजावणार्या व हजारो रुग्णांचे जीव वाचविणार्या १०२ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेवरील चालकांना गेल्या दहा महिन्यांपासून वेतन नाही, त्यामुळे या संतप्त रुग्णवाहिका चालकांनी स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट रोजी सामूहीक आत्मदहनाचा इशारा दिला आहे.

२००६ साली या १०२ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेवर चालकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. गेल्या १९ वर्षांपासून हे चालक इनामे इतबारे सेवा बजावित आहेत. विशेषतः आपत्कालीन स्थितीत धाव घेऊन रुग्णांचे प्राण वाचवित आहेत. रात्रंदिवस सेवा बजावणार्या या रुग्णवाहिका चालकांना आधीच ५ ते सहा हजार रुपयांचे तोकडे मानधन आहे. असे असूनसुध्दा गेल्या १० महिन्यांपासून या वाहन चालकांचे वेतनच यंत्रणेने थकविले आहे. त्यामागील कारणेसुध्दा यंत्रणेद्वारे स्पष्ट होत नाहीत. कहर म्हणजे या जिल्ह्यात नव्याने स्थापन केलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात २०२२ पासून नियुक्त रुग्णवाहिका चालकांना दरमहा १७ हजार ८०० रुपयांचे मानधन वितरीत होत आहे. हीच सेवा, तीच जबाबदारी ते ही १९ वर्षांपासून बजावत असतांना या रुग्णवाहिका चालकांच्या वेतनात यंत्रणेने काडीचीही वाढ केली नाही. त्यामुळे सामान्य मजूरापेक्षा कमी वेतनात जीवावर उदार होऊन सेवा बजावणार्या या चालकांनी आता यंत्रणेच्या विरोधात एल्गार पुकारला आहे.

राजकीय आणि प्रशासकीय पातळीवरुन या विषयात लक्ष न घातल्यास स्वातंत्र्यदिनी सामूहीक आत्मदहन करु, असा इशारा या रुग्णवाहिका चालकांनी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा महसूल अधिकारी व जिल्हा पोलिस अधिक्षकांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

## हिंदवी स्वराज्य स्वातंत्र्य दिनानिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान यांच्या वतीने पदयात्रा

परभणी दि.१३:- भारत देशाच्या८९स्वातंत्र्य दिनानिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान परभणी विभागाच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी.हिंदवी स्वराज्य स्वातंत्र्य दिन पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. आहे

दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी. ठिक सकाळी ९:३०वा शहरातील श्री पेडाहनुमान मंदिर, स्टेशन रोड परिसर सदरील पदयात्रेला प्रारंभ होणार असून. देशभक्तीपर गीत पद्य, श्लोक यांचा जागर होणार असून. आयोजकांच्या वतीने नुकतीच एक बैठक घेण्यात आली असून हिंदवी स्वराज्य स्वातंत्र्य दिन पदयात्र. व्यापक स्वरूपात काढण्यात येणार आहे नियोजन करण्यात आले आहे. सदरील पदयात्रेत विद्यार्थी युवक युवती शिवशंभु पाईक व सर्व स्तरातील नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान परभणी विभागाचे अध्यक्ष श्री शंकर देशमुख परभणी विभाग(+९१ ८९७५६ ८०७९४) यांनी दिली.

# हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत परभणी शहरात विद्यार्थ्यांची भव्य तिरंगा सायकल रॅली संपन्न

परभणी, दि. १२ : हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत जिल्हा प्रशासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या विद्यमाने परभणी शहरात आज सकाळी तिरंगा सायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीचा शुभारंभ अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे यांच्या हस्ते करण्यात आला. रॅलीत मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते. रॅलीची सुरुवात जिल्हा क्रीडा संकुल येथून झाली. ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज यांचा



पुतळा, विसावा कॉर्नर मार्गे गांधी पार्क, शिवाजी चौक येथुन जनता मार्केट, ग्रॅन्ड कॉर्नरवरुन महात्मा ज्योतीबा फुले यांचा पुतळा मार्गे जिल्हा क्रीडा संकुल येथे सायकल रॅलीची समारोप झाला.

रॅलीत विविध देशभक्तीपर घोषणा देण्यात आल्या. यावेळी वाहतुक शाखा पोलीस निरीक्षक वामन बेले, महात्मा गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक पी.आर.जाधव, तालुका क्रीडा अधिकारी कल्याण पोले, राज्य क्रीडा मार्गदर्शक संजय मुंढे, क्रीडा अधिकारी सुयश नाटकर आदी उपस्थित होते.

रॅलीत गांधी विद्यालय, भारतीय बाल विद्यामंदीर, डॉ. जाकेर हुसेन विद्यालय, खो-खो प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील धिरज नाईकवाडे, योगेश आदमे, भागवत दुधारे, प्रकाश पंडित यांनी परिश्रम घेतले.

## पिंपळदरी येथील ३३ के.व्ही. उपकेंद्रात क्षमता वाढ केलेल्या रोहित्राचे पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते लोकार्पण



परभणी, दि. १३ (जिमाका) : गंगाखेड तालुक्यातील पिंपळदरी येथील ३३/११ के.व्ही. वीज उपकेंद्रामध्ये नव्याने क्षमतावाढ केलेल्या व नव्याने आस्थापित केलेल्या अतिरिक्त ऊर्जा रोहित्राचा लोकार्पण सोहळा पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते सोमवारी (दि. ११) पार पडला. या प्रकल्पामुळे परिसरातील नागरिकांना अधिक चांगल्या प्रकारे वीज सेवा उपलब्ध होणार आहे.

यावेळी गंगाखेड उपविभागीय अधिकारी जिवराज डापकर, महावितरणचे अधिक्षक अभियंता आर.के.टेंभुर्णे, यांच्यासह अधिकारी, कर्मचारी तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते. पिंपळदरी उपकेंद्राची सध्याची क्षमता ३.१५ एमव्हीए होती. आता वाढीव क्षमतेमुळे ५ एमव्हीए झाली आहे. वाढीव पावर ट्रान्सफॉर्मर चालू झाल्यामुळे लोड डिव्हाईड होऊन व्हॉल्टेज सुधारेल व विद्युत पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण कमी होईल. या उपकेंद्रावर जोडलेल्या गावांना व विद्युत ग्राहकांना चांगल्या गुणवत्तेचा वीज पुरवठा मिळेल.

# बेंडकी तांड्यावरील विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांद्वारे शाळेच्या मागणीकरीता जि.प.वर धडक मोर्चा : विद्यार्थी वर्षानूवर्षापासून शिक्षणापासून वंचित

परभणी,दि.१३(प्रतिनिधी) : पालम तालुक्यातील मौजे बोरगांव (खु.) अंतर्गत बेंडकी तांडा येथील विद्यार्थ्यांकरीता जिल्हा परिषद अंतर्गत नवीन प्राथमिक शाळा विशेष बाब म्हणून मंजूर करावी, या मागणीसाठी या तांड्यावरील संतप्त विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य इमारतीवर बुधवारी (दि.१३) जोरदार धडक मोर्चा काढला.



गावांतर्गत तांड्यावरुन जवळच्या दुसर्या शाळेत जाण्यास ओढ्या, नाल्यांमुळे नैसर्गिक अडथळे येत आले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना दुसर्या शाळेत जाणे अशक्य ठरु लागले आहे. त्या शाळेचे अंतरसुध्दा तांड्यापासुन एक किलो मीटर पेक्षा अधिक आहे. नव्या शैक्षणिक धोरणानुसार एक किलो मीटरच्या आत प्राथमिक शाळा उपलब्ध करुन द्यावी, असे स्पष्ट निर्देश आहेत. परंतु, तांडा वस्तीवरील या विद्यार्थ्यांना शाळेअभावी मूलभूत शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे.

बोरगांवसह तांड्यावरील ग्रामस्थांनी यासाठी जिल्हा परिषद प्रशासनास वारंवार निवेदने सादर केली. महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या परभणी जिल्हा काऊन्सीलनेही यासाठी मोठा पाठपुरावा केला, परंतु प्रशासकीय स्तरावरुन हालचाली झाल्याच नाहीत. त्यामुळे तेथील संतप्त विद्यार्थ्यांनी व ग्रामस्थांनी बुधवारी जिल्हा परिषद कार्यालय गाठले व अधिकार्यांना चांगलेच धारेवर धरले. विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांच्या घोषणाबाजीमुळे संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.

## रेणापूर शाळेस ५३ इंची स्मार्ट अँड्रॉइड एलईडी भेट



प्रतिनिधी

पाथरी:-तालुका वैद्यकीय अधिकारी म्हणून अनेक वर्ष सेवा बजावलेले कै.डॉ.भास्करराव रघुनाथराव टेंगसे यांच्या स्मृती प्रित्यर्थ त्यांचे चिरंजीव किडनी स्पेशालिस्ट डॉ.राहुल भास्करराव टेंगसे व डॉ.अमित भास्करराव टेंगसे यांनी रेणापूर जिल्हा परिषद शाळेतील गोरगरीब विद्यार्थ्यांना आधुनिक व डिजिटल शिक्षण मिळावे या उद्देशाने शाळेला ४० हजार रुपये किमतीचा ५३ इंची अँड्रॉइड स्मार्ट एलईडी सोमवार ११ ऑगष्ट रोजी सप्रेम भेट दिला.

यावेळी डॉ.राहुल टेंगसे यांनी शाळेतील प्रत्येक वर्गास भेट देऊन विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला शैक्षणिक गुणवत्ते बरोबरच मुलांनी क्रीडाक्षेत्र व कला क्षेत्रात जाण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन केले.

यावेळी शिवसेना युवा जिल्हा प्रमुख दीपक टेंगसे, भगवानराव टेंगसे,कृष्ण हारके, गणेश टेंगसे,दिगंबर जोशी बाळासाहेब टेंगसे,आदिनाथ टेंगसे,अशोक टेंगसे,बंडू पवार, शंकरराव टेंगसे, मुरलीधर रोकडे, हरिभाऊ उजगरे तसेच शाळेचे मुख्याध्यापक आर बी किरवले, सर्व शिक्षक इत्यादींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आभार श्री नेताजी वागाळे यांनी मानले.

# नगररचनाकाराच्या गैरहजेरीने शेकडो बांधकाम परवाने ठप्प

### परभणी महानगरपालिका : पूर्णवेळ नगररचनाकाराचे पद रिक्त : अतिरिक्त कारभार सांभाळणार्या महिला अधिकार्यास वेळ मिळेना

परभणी (प्रतिनिधी) : महानगरपालिकेंतर्गत बांधकाम विभागाकडे गेल्या दोन-अडीच महिन्यांपासून शेकडो बांधकाम परवान्यांचे प्रस्ताव अक्षरशः धुळखात आहेत. परंतु, नगररचनाकाराचा अतिरिक्त पदभार सांभाळणार्या नांदेड येथील महिला अधिकार्यास आठवड्यातून किमान दोनवेळासुध्दा परभणीस यावे वाटेनासे झाले आहे. त्याचा परिणाम बांधकामधारकात या गलथानपणाबद्दल तीव्र संताप व्यक्त होत आहे.

महानगरपालिकेतील नगररचनाकार चंद्रकांत वाडेकर हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यामुळे नगररचनाकार या पदावर पूर्णवेळ अधिकार्याची लवकरच नियुक्ती होईल, असे अपेक्षित होते. परंतु, सरकारी पातळीवरील लालफिती कारभारामुळे महानगरपालिकेत पूर्णवेळ नगररचनाकार आजपर्यंत नियुक्त झालाच नाही. अन्य जिल्ह्यातील अधिकार्यांनीही परभणी महानगरपालिकेत यावयास फारसी उत्सुकता दाखविली नाही. त्यामुळे हे पद गेल्या दोन-अडीच महिन्यांपासून रिक्त आहे. नांदेड महानगरपालिकेतील नगररचनाकार कविता कौर यांच्याकडे परभणी महापालिकेंतर्गत नगररचना विभागाचा अतिरिक्त पदभार सुपुर्त करण्यात आला आहे. त्या आठवड्यातून किमान दोन वेळेस परभणीत येवून प्रशासकीय कामे मार्गी लावतील, असे अपेक्षित होते. दुर्दैवाने श्रीमती कौर यांनी परभणी महापालिकेत आठवड्यातून दोनवेळा यावयास फारसे स्वारस्य दाखविले नाही. त्याचा परिणाम नगररचना विभागांतर्गत दैनंदिन कामकाम पूर्णतः कोलमडले आहे. विशेष म्हणजे शेकडो बांधकाम परवान्यांचे प्रस्ताव धूळखात पडले आहेत. बांधकामधारक महापालिकेत अक्षरशः खेटे मारीत आहेत. परंतु, अतिरिक्त नगररचनाकार या आठवड्यात परभणीत आल्याच नाहीत, अशी उत्तरे मिळू लागली आहेत. गेल्या दोन अडीच महिन्यांपासून मिळणार्या या उत्तरामुळे बांधकामधारक आता कमालीचे संतापले आहेत.

राज्य शासनाचेही नगररचनाकार पद रिक्त...

महानगरपालिकेप्रमाणेच राज्य शासनाच्याही नगररचना विभागाचे नगररचनाकार पद हे महिनोन् महिन्यापासून रिक्त आहे. तेथीलही नगररचनाकार पदाचा अतिरिक्त कारभार हा नांदेड महापालिकेच्या नगररचनाकार श्रीमती कविता कौर यांच्याकडेच सुपूर्त करण्यात आला आहे. त्यांच्याकडे परभणी महानगरपालिकेच्या नगररचनाकाराचा पदभार आहे. या स्थितीतसुध्दा दोन दोन पदभार असतांनाही श्रीमती कौर नांदेडहून आठवड्यातून किमान दोन वेळेस सुध्दा येऊन कामे मार्गी लावेनाशा झाल्या आहेत.

# शिंदेंना टार्गेट करण्याऐवजी अन्य प्रश्नांवर लढा : अर्जून खोतकर यांचा उबाठा गटास सल्ला

### परभणीत शिवसेनेद्वारे मेळावा : काही पदाधिकार्यांसह कार्यकर्त्यांना शिवसेनेत प्रवेश

परभणी,दि.११(प्रतिनिधी) : राज्याचे कार्यक्षम उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विकासदृष्टी, जनहितकारी कामगिरी आणि लोकाभिमुख धोरण सर्वदूर प्रभावी ठरत असून शिवसेनेच्या उबाठा गटाने उठसूट शिंदे यांना टार्गेट करण्याचे धोरण थांबविले पाहिजे, शेतकर्यांसह अन्य प्रश्नांवर लढले पाहिजे, अशी प्रतिक्रिया शिवसेनेचे नेते माजी मंत्री अर्जून खोतकर यांनी व्यक्त केली.

येथील एमआयडीसीतील व्यंकटेश मंगल कार्यालयात सोमवारी (दि.११) शिवसेनेच्या पदाधिकार्यांची महत्वपूर्ण बैठक



आयोजित करण्यात आली होती. त्यानिमित्त खोतकर हे परभणीत दाखल झाले होते. मेळाव्या पाठोपाठ पत्रकारांशी हितगुज करतेवेळी खोतकर यांनी ठाकरे यांच्या उठसूट सुरु असणार्या टिका टिप्पणीवर जोरदार टिका केली. शिंदे यांनाच सातत्याने टार्गेट करण्याऐवजी शेतकर्यांसह अन्य काही प्रश्न आहेत, त्यावरही ठाकरे यांनी लक्ष दिले पाहिजे, त्यासाठी लढले पाहिजे, असा टोला मारला. तसेच राज्यासह केंद्राची आर्थिक स्थिती मजबुत आहे. राज्य प्रगतीकडे वाटचाल करीत आहे, असेही ते म्हणाले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका स्वबळावर कि स्वतंत्रपणे लढवायच्या या संदर्भातील निर्णय स्थानिक पातळीवरील स्थिती ओळखून, पदाधिकार्यांची हितगूज करुनच घेतला जाईल, असेही ते म्हणाले. संघटनात्मक बांधणी करा - खोतकर

शिवसेनेच्या या मेळाव्यात खोतकर यांनी नेतेमंडळींसह पदाधिकार्यांनी संघटनात्मक बांधणीवर लक्ष केंद्रीत करावे, असे आवाहन केले. शिवसेना पक्ष हा सर्वसामान्य जनतेच्या सेवेसाठी आहे. आपण प्रत्येक घराघरात पोहोचून जनतेच्या समस्या सोडवल्या पाहिजेत, त्यांच्या सुखा दुःखात सोबत उभे राहिले पाहिजे, असे आवाहन केले. येणार्या काळात परभणी महानगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा निश्चितच फडकवू, असा विश्वासही व्यक्त केला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, विशाल कदम, मा. खासदार सुरेश जाधव, मा. आ. हरिभाऊ काका लहाने, शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, राजू कापसे, माणिक पोंढे, बाळासाहेब पानपट्टे, होंगे पाटील, प्रभाकर कदम, केशवराव कदम, गीता सूर्यवंशी, सखुबाई लटपटे, प्रवीण देशमुख, शीलाताई शेटे, कल्पना दळवी, प्रकाश फरकंदकर, शेषराव मोहिते, आप्पाराव वावरे, तसेच परभणी जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून आलेले शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला आघाडीच्या सदस्यांसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिल्लोड शहरात तिरंगा रॅली संपन्न



सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि. १३, दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजीच्या स्वातंत्र्य दिनाच्या अनुषंगाने हर घर तिरंगा अभियान अंतर्गत सिल्लोड नगर परिषदेच्या वतीने आज सिल्लोड शहरात मोटारसायकल तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. नगर परिषदेचे मुख्याधिकारी कारभारी दिवेकर यांच्याहस्ते तर पोलीस निरीक्षक शेषराव उदार यांच्या प्रमुख उपस्थितीत तिरंगा रॅलीचे उद्घाटन संपन्न झाले.

शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते प्रियदर्शनी चौक पर्यंत ही रॅली काढण्यात आली होती. स्वातंत्र्य दिनाच्या अनुषंगाने दिनांक १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधी हर घर तिरंगा अभियान राबविण्यात येत आहे. हर घर तिरंगा या अभियानात नागरिकांनी सहभागी होवून स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करावा असे आवाहन नगर परिषदेच्या वतीने करण्यात आले.

या रॅलीमध्ये माजी नगरसेवक विठ्ठल सपकाळ , शंकरराव खांडवे, प्रशांत क्षीरसागर, सुधाकर पाटील ,मनोज झंवर, तसेच शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल,कृउबा समितीचे संचालक शेख जावेद , सयाजीराव वाघ, युवासेनेचे शिवा टोम्पे, मानसिंग राजपूत, मुस्ताक देशमुख, मतीन देशमुख ,कुणाल सहारे , संदीप हाडोळे ,महेश पाटील, फहिम पठाण यांच्यासह उपमुख्याधिकारी आयुब बाबा सय्यद, प्रशासकीय अधिकारी जुबेर सिद्दीकी, प्रकल्प अधिकारी देवेंद्र सूर्यवंशी, आस्थापना अधिकारी विशाल वाघ, प्रधानमंत्री आवास योजनेचे समनव्यक ओंकार महाजन, सुनीता आरके, शेख अजीम, सतिश सुर्यतळे, श्रीराम काथार, छोटुराम दुधे, अन्वर पठाण, शेख अजीम, सहाय्यक कक्ष प्रमुख दीपक दाभाडे यांच्यासह नगर परिषदेचे अधिकारी , कर्मचारी आदींसह नागरिकांची उपस्थिती होती.

## चढ्या दराने मद्यविक्री, १७ विक्रेत्यांवर कारवाई;साडेआठ लक्ष रुपये दंड

छत्रपती संभाजीनगर, दि.१३ – किरकोळ विक्री दरापेक्षा जादा दराने मद्यविक्री करणाऱ्या १७ मद्य विक्रेत्यांवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने कारवाई केली असून साडेआठ लाख रुपये दंड आकारला आहे, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत देण्यात आली आहे. यासंदर्भात अधिक माहिती अशी की, जून २०२५ मध्ये मद्याची दरवाढ करण्यात आली. त्यानंतर जिल्ह्यातील काही अनुज्ञप्तीधारकांनी कमाल किरकोळ किंमतीपेक्षा (चठझ) जास्त दराने मद्याची विक्री केल्याची तक्रार राज्य उत्पादन शुल्क विभागास प्राप्त झाली. त्यानुसार राज्य उत्पादन शुल्क विभागाने जिल्हाभरात सर्वंकष विशेष मोहीम राबवली. या मोहिमे दरम्यान, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १७देशी मद्यविक्री अनुज्ञप्तीधारकांवर कारवाई करून त्यांच्याविरुद्ध गुन्हे नोंदवण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वाम यांनी अशा मद्य विक्रेत्यांवर साडेआठ लाख रुपयांचा दंड आकारला. जिल्ह्यात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर अशी कारवाई करण्यात आली आहे. नियमांचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकांविरुद्ध परवाना निलंबन आणि कायमस्वरूपी रद्द करण्याची कठोर कारवाई करण्यात येईल,असे जिल्हाधिकारी स्वामी यांनी स्पष्ट केले आहे.

## स्वातंत्र्यदिनाचा मुख्य शासकीय सोहळा विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात

छत्रपती संभाजीनगर, दि.१३ – स्वातंत्र्यदिनाचा मुख्य शासकीय समारंभ शुक्रवार दि.१५ रोजी सकाळी ९ वा. ५ मि. नी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या प्रांगणात आयोजीत करण्यात आला आहे. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण होणार आहे. या सोहळ्यास स्वातंत्र्य सैनिक, माजी सैनिक, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी, अधिकारी- कर्मचारी यांनी उपस्थित रहावे,असे आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर व जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

## तालुकास्तरीय अखिल भारतीय विज्ञान मेळावा-२०२५ उत्साहात संपन्न



सोयगाव,दि.१३ ऑगस्ट – सोयगाव तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा सोयगाव येथे गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे,सचिन पाटील,शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील मेळाव्याचे नियोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन सोयगाव केंद्राचे केंद्र प्रमुख फिरोज तडवी,विषय साधन व्यक्ती परमेश्वर कठोरे,दौलतसिंग परदेशी,जिल्हा प्रशाला सोयगाव,मुख्याध्यापक,जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळा सोयगाव यांच्या हस्ते करण्यात आले. तालुक्याचा निकाल पुढीलप्रमाणे-प्रथम क्रमांक कुमारी गायत्री विनोद जैस्वाल,फर्दापूर, द्वितीय क्रमांक कुमारी सिद्धी विनोद नेरपगार,गोंदेगाव,तृतीय क्रमांक- कुमारी प्रतिक्षा विजय पगारे,सोयगाव,यासर्व विद्यार्थ्यांचे सचिन शिंदे,गटशिक्षणाधिकारी,सोयगाव,सचिन पाटील, फिरोज तडवी,केंद्र प्रमुख,सोयगाव,विलास वालदे,दौलतसिंग परदेशी,व्ही.एस.चौधरी यांनी अभिनंदन केले.विज्ञान मेळावा यशस्वीतेसाठी कठोरे विषय साधन व्यक्ती,विज्ञान शिक्षक रामचंद्र महाकाळ, व मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद,सोयगाव यांनी प्रयत्न केले.

## सोयगाव येथील कै.बाबुरावजी काळे स्कूल येथे डॉ.विक्रम साराभाई यांची जयंती साजरी

सोयगाव,दि.१३ ऑगस्ट – १२ ऑगस्ट,इस्रोचे संस्थापक महान शास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ.विक्रम साराभाई यांचा जन्मदिवस कै.बाबुरावजी काळे स्कूल मध्ये डॉ.विक्रम साराभाई यांची जयंती साजरी करण्यात आली.डॉ.साराभाई हे भारतीय भौतिकशास्त्रज्ञ व खगोलशास्त्रज्ञ होते. ते भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात.बऱ्याच राजकीय व्यक्तिंशी त्यांचे संबध असल्याने रवींद्रनाथ टागोर,जवाहरलाल नेहरू,सरोजिनी नायडू,महात्मा गांधी आदी लोकांचे त्यांच्या घरी जाणे-येणे होते,असे प्रतिपादन विज्ञान शिक्षक योगेश काळे यांनी केले. ते जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना बोलत होते.सर्वप्रथम विद्यार्थ्यांना प्रोजेक्टद्वारे जीवनपट दाखवण्यात आला.विद्यार्थ्यांना भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) विषयी माहिती देण्यात आली.या वेळी शाळेचे मुख्याध्यापक निलेश पाटील,उपमुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलीस,सागर घाटे,मंगेश निकम व विज्ञान विषय शिक्षक योगेश काळे उपस्थित होते.

## अविनाश देशमुख यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी – मायानगर एन-२ सिडको येथील रहिवासी आणि सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे निवृत्त मॅनेजर अविनाश भास्करराव देशमुख (६३) यांचे बुधवार दि.१३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९.२५ वा. आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर दुपारी ४ वाजता मुकुंदवाडी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# संस्कार आणि संस्कृतीचे संवर्धन मुली करतील – उपाध्याय श्री विरंजन सागर जी महाराज

छत्रपती संभाजीनगर – घरातील मुलगी जेव्हा शिक्षिका, डॉक्टर, संत किंवा सेविका बनते तेव्हा समाजाचा उत्थान होतो. उपाध्याय श्री विरंजन सागर जी महाराज छत्रपती सभाजीनगर श्री १००८ मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिर देशमुख नगर येथे गर्ल्स करिअर काउन्सेलिंगचे आयोजन करण्यात आले. यामध्ये मुनिश्रींनी सांगितले की सर्जनाची शक्ती ही स्त्री आहे. आई आणि मुलगी या दोन्ही सर्जनशीलतेच्या प्रतीक आहेत. आई जीवनाला जन्म देते आणि मुलगी त्या परंपरेला पुढे नेत असते. मुलगी ही संस्कारांची वाहक असते व समाजात परिवर्तनाची प्रेरणा ठरते. मुलींनी नेहमी संस्कारित जीवन जगावे.



स्त्रीच्या पाच शक्ती असतात – सहनशीलता, कर्तृत्व, विनम्रता आणि नारीचे तीन रूपे – दुर्गा, लक्ष्मी आणि सरस्वती भारतात कन्येला विशेष महत्त्व दिले गेले आहे, पण आज काही मुली चुकीच्या संगतीत पडून पालकांचा आणि समाजाचा मान कमी करणारे पाऊल उचलतात. मुनिश्रींनी आवाहन केले की जीवनात पालकांचा मान उंचावा, पण असे कोणतेही कार्य करू नये ज्यामुळे त्यांचा मान खाली जाईल.

मुनिश्रींनी मुलींसाठी पाच सूत्रे दिली आत्महत्या कधीही करू नये, संघर्षशील राहावे सकारात्मक विचार ठेवावा आपल्या ध्येयासाठी समर्पित राहावे चुकीच्या संगतीपासून दूर राहावे आरोग्य टिकवावे मुनिश्रींनी सांगितले की अशा मुलींच्या संमेलनामुळे भावनिक बंध दृढ होतात, आत्मविश्वास वाढतो आणि सांस्कृतिक चेतना जागृत होते. मुली सकारात्मक असतील तर राष्ट्राचे भविष्य मजबूत होईल. घरातील मुलगी जेव्हा शिक्षिका, डॉक्टर, संत किंवा सेविका बनते तेव्हा समाजाचा उत्थान होतो. धार्मिक ग्रंथांमध्येही स्त्रीला श्रद्धा व शक्तीचे रूप म्हटले आहे.

यश मिळवण्यासाठी मुनिश्रींनी तीन सूत्रे दिली – आपले लक्ष्य निश्चित करा, लगन व जिद्दीने कार्य करा, प्रयत्न सुरू ठेवा.

मुनिश्रींनी प्रेरणादायी संदेश दिला – काम असे करा की ओळख निर्माण होईल, पाऊल असे टाका की ठसा उमटेल, जगणे सगळेच जगतात पण आपण असे जगा की इतरांसाठी उदाहरण बनाल.

गर्ल्स करिअर काउन्सेलिंगमध्ये मुलींना संस्कार विधीचे महत्त्व समजावले गेले. हजारो मुलींनी गुरुंच्या सान्निध्यात संकल्प घेतला की आम्ही परिवार, समाज व राष्ट्राच्या सेवेसाठी समर्पित राहू, आत्महत्या कधी करणार नाही आणि चुकीचे पाऊल उचलणार नाही.

या कार्यक्रमात मुनिश्रींनी सर्व मुलींना आशीर्वाद दिला. प्रमुख पाहुणे जितेंद्र पापळकर (कमिश्नर) व त्यांचा परिवार उपस्थित होता. दीपप्रज्वलन सुप्रिया पापलकर, कंचन देसरडा, निरुपमा बाफना, सुनीता देसरडा प्रमिला दोषी,

सोनम भरूका आशिमा जैस्वाल, श्रुति अमित सोनटक्के यानी केले. समाजातील विविध संस्था, मान्यवर व श्री १००८ भगवान मल्लिनाथ दिगंबर जैन मंदिर देशमुख नगरच्या मंदिर वतीने हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

# हॉटेल्सचालक, अन्न व्यावसायिकांचे प्रशिक्षण; ग्राहक देवतेचा ‘नैवेद्य’ भेसळमुक्त असावा- जिल्हाधिकारी

छत्रपती संभाजीनगर, दि.१३ – ग्राहकाला आपण दैवत मानतो. असा हा ग्राहक आपल्याकडे उदरभरणासाठी येतो तेव्हा त्याचा नैवेद्य हा भेसळमुक्त आणि सुरक्षित असावा याची दक्षता सर्व अन्न व्यावसायिकांनी घ्यावी,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज हॉटेल व अन्न व्यावसायिकांना केले.

आगामी सण उत्सव काळात खाद्यपदार्थ विक्री वाढते अशा वेळी लोकांना शुद्ध,सकस आणि निर्भेळ, भेसळमुक्त अन्न पदार्थ मिळावेत यासाठी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी, ‘सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षेचा’ हा उपक्रम राबविला आहे. त्याअंतर्गत जिल्ह्यातील हॉटेल्स व अन्न व्यावसायिकांची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात बोलावण्यात आली. अन्न सुरक्षा नियम व निकषांबाबत हॉटेल्स व्यावसायिकांचे प्रशिक्षणही घेण्यात आले.

सहा. आयुक्त अन्न व औषध प्रशासन द.वि. पाटील, सहायक आयुक्त निखिल कुलकर्णी, अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती प्र.प. सुरसे, श्रीमती सु.त्रि. जाधवर, श्रीमती वर्षा रोडे, एस.बी. तायडे, मो. फ. सिद्दीकी, पी.एस. अंजिठेकर तसेच हॉटेल्सचालक, अन्न व्यावसायिक उपस्थित होते.

आगामी सण व उत्सवाच्या काळात जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर मिठाई, फरसाण, सुका मेवा अशा अन्नपदार्थांची विक्री होत असते. मागणी जादा असल्याने भेसळीची शक्यता वाढते. अशावेळी घातक घटकांनीयुक्त मिठाईपासून नागरिकांचे रक्षण करणे आवश्यक आहे. नागरिकांना सुरक्षित सकस व निर्भेळ अन्न उपलब्ध व्हावे यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून विशेष तपासणी मोहिम राबविण्यात येत आहे. या तपासणीत मिठाईचे उत्पादन करणाऱ्या आणि विक्री करणाऱ्या दुकानांची तपासणी, उत्पादनासाठी वापरण्यात येणारे दुध, खवा, मावा, तूप, साखर, मैदा, आणि इतर घटकांची तपासणी करण्यात येणार आहे. भेसळयुक्त घटकांचा शोध अन्न सुरक्षा आणि मानक कायदा २००६ च्या मार्गदर्शक तत्वानुसार, मिठाईमध्ये वापरण्यात येणारे घटक जसे की खवा मावा, आणि तूप हे भेसळयुक्त आहेत किंवा नाही याची खात्री करण्यात येणार आहे अशी माहिती प्रास्ताविकात पी.एस. अंजिठेकर यांनी दिली.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, कुणीही अन्न व्यावसायिक जाणीवपूर्वक भेसळ करत नसतात. मात्र अल्प लाभाच्या मोहापायी बऱ्याचदा असे कृत्य घडते. आपल्या फायद्यासाठी आपण कुणाच्या आरोग्याशी खेळू नका. ग्राहकाला आपण देव मानतो त्या देवाचा नैवेद्य हा भेसळमुक्त आणि शुद्ध असावा,असे आवाहन त्यांनी केले.

# सोशलमिडीयाच्या व्यसनापासून दुर रहा : अक्षय महाराज भोसले

तभा वृत्तसेवा

पैठण दि १३ :- विज्ञानाने प्रगती केली पण लहान पोरं वाया गेली, लहान वयातच संस्कार होतात परंतु आज प्रत्येक कुटुंबातील युवा वर्ग मोबाईल मध्ये गुंतला यामुळे सोशलमिडीयाचे व्यसन लागले.या व्यसनापासुन दुर राहायचे असेल तर हरी नामाचा नामस्मरण करा,अध्यात्माची ओढ निर्माण करुण भगवंताशी मैत्री करा म्हणजे म्हणजे तो तुम्हाला बोलेल.अशा आपल्या आमृततुल्य वानीतुन युवकांना संदेश देत संत ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर सुवर्ण जन्मोत्सव सोहळ्याला मोठ्या थाटात प्रारंभी युवा किर्तनकार अक्षय महाराज भोसले यांनी किर्तनरुपी सेवा दिली. दि,१३ बुधवार रोजी श्रीक्षेत्र आपेगाव ता.पैठण येथे संत ज्ञानेश्वर महाराज जन्मोत्सवाला प्रारंभ झाला.



दरम्यान सकाळी माऊली संस्थानचे अध्यक्ष ज्ञानेश्वर महाराज कोल्हापूरकर यांच्या उपस्थितीत ध्वज पुजन मार्केट कमेटीचे सभापती राजुनाना भुमरे यांच्या हस्ते करण्यात आले.तदनंतर ज्ञानेश्वरी पारायण झाले.

पहिल्या दिवशी पंचक्रोशीतील बारा गावातील माऊली भक्तांनी सकाळी,सध्यांकाळी दहा किंट्टलचे भाकरी पोहच केल्या.यात रोज संयोजन समितीचे अध्यक्ष आमदार विलासबाप्पु भुमरे यांच्या वतीने सकाळ, संध्याकाळचे भोजन व्यवस्था करण्यात येत आहे. आपेगाव येथील शंभर युवक रोज सकाळ,संध्याकाळच्या भोजन पंगतीत भाविकांना वाढण्यासाठी सेवा देत आहेत.

# लाखेगाव शिवारातील शंभर हेक्टर कापूस पिकाचे नुकसान नुकसान भरपाई द्या : विजय चव्हाण

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १३ ऑगस्ट – पैठण तालुक्यातील लाखेगाव शिवारातील शंभर हेक्टर कापूस पिकाचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य तथा भाजपा बिडकीन मंडळ अध्यक्ष विजय चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना निवेदन पाठवून मागणी केली आहे. लाखेगाव परिसरातील



शिवारातील शंभर हेक्टर क्षेत्रावर कापूस पिकाचे जून महिन्यात लागवड करण्यात आली होती. परंतु दीड महिन्याचे पीक असताना नेमके नैसर्गिक वातावरणाच्या बदलामुळे पिकाची वाढ खुटली व उभे पीक अचानक जळून खाक झाले तरी लाखेगाव शिवारातील शेतकरी शेतीवर अवलंबून असून त्यांच्या कुटुंबाचे उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून आहे, तरी महसूल विभागाने पिकाचे पंचनामा करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य तथा भाजपा बिडकीन मंडळ अध्यक्ष विजय चव्हाण यांनी निवेदन द्वारे मागणी केली आहे.

# श्रीक्षेत्र अडबंगनाथ तपोभूमी भामानगर येथे १५ ऑगस्टला एकदिवसीय नवनाथ पारायणचा भाविकांनी लाभ घ्या, स्वामी अरुणा नाथ गिरीजी महाराज

खुलताबाद प्रतिनिधी संतोष करपे. श्री क्षेत्र भामानगर, श्रावण महिना हा सनातन हिंदू धर्मानुसार व्रत, वैकल्य, पूजा, अनुष्ठान आणि पारायणासाठी अत्यंत पुण्यप्रद मानला जातो. या पवित्र महिन्यात भाविक विविध धर्मग्रंथांचे पारायण करून आध्यात्मिक लाभ घेतात. विशेषतः नवनाथ ग्रंथ हा अत्यंत फलदायी ग्रंथ असून त्याच्या पारायणाने सुख, समाधान आणि शांती लाभते, असे मानले जाते. अशी माहिती अडबंगनाथ संस्थान श्री क्षेत्र, भामाठाण मठपती अरुण नाथगिरी जी महाराज यांनी दिली

मात्र चाळीस अध्याय आणि सुमारे ७,६०० ओव्या असलेला पूर्ण नवनाथ ग्रंथ पारायणासाठी अनेक दिवस लागतात. आजच्या व्यस्त जीवनशैलीत अनेकांना हे शक्य होत नसल्याने, श्री निळकंठराव तरकासे बाबूजी लिखित संक्षिप्त श्री नवनाथ पारायण गाथा हा ग्रंथ अडबंगनाथ संस्थान मठपती भामाठाण तालुका श्रीरामपूर. स्वामी अरुणनाथगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आला आहे.



या ग्रंथातही मूळप्रमाणे चाळीस अध्याय असले तरी ओव्यांची संख्या फक्त १,३०० आहे, ज्यामुळे एका दिवसात संपूर्ण पारायण शक्य होते.

या संक्षिप्त ग्रंथाचे प्रकाशन नुकतेच ९ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन पौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर झाले. याचाच एकदिवसीय सामुदायिक पारायण सोहळा श्री क्षेत्र अडबंगनाथ तपोभूमी मंदिर, भामानगर (भामाठाण), ता. श्रीरामपूर येथे १५ ऑगस्ट रोजी गोकुळ अष्टमीच्या महापर्वावर सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या पारायणाचा लाभ घेण्यासाठी इच्छुक भाविकांनी

संस्थानाशी संपर्क साधून नाव नोंदणी करावी,व . तसेच, अन्नदान महाप्रसादासाठी सहकार्य करू इच्छिणाऱ्या भाविक भक्तांनी संस्थांशी संपर्क साधा असे आवाहन करण्यात आले आहे

## घरोघरी राबवा ‘हर घर तिरंगा अभियान’: दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.१३ – देशभक्तीचे उत्साहपूर्ण वातावरण असून त्यात घरोघरी हर घर तिरंगा हे अभियान राबवा,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे. यासंदर्भात आज जिल्ह्यातील सर्व तालुका कार्यालये, आरोग्य अधिकारी, गटविकास अधिकारी, तहसिलदार यांच्याशी जिल्हाधिकारी स्वामी यांनी दुरदृष्य प्रणालीद्वारे संवाद साधला. उपजिल्हाधिकारी सामान्य शाखा श्रीमती संगिता राठोड. एकनाथ बंगाळे, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ आदी मुख्यालयातून सहभागी झाले होते.

पंजाब एण्ड सिंध बैंक
PUNJAB & SIND BANK
(भारत सरकारचा उपक्रम)
मुंबई अंचल

जागेची आवश्यकता

शाखा उघडणे / स्थलांतरित करण्यासाठी निम्न परिसरात तळमजल्यावरील जागा किमान १५ वर्षांसाठी भाडेपट्टीवर घेण्यास बँक इच्छुक आहे.

| शाखेचे नाव व परिसर | चटई क्षेत्र चौ.फूट |
|---|---|
| छत्रपती संभाजी नगर शहर, जिल्हा छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र (प्राधान्य क्षेत्र: बजरंग चौक, जालना रोड) | १२०० चौरस फूट पर्यंत |

इच्छुक पक्षांकडून दोन वेगवेगळ्या लिफाफ्यांमध्ये निर्धारित नमून्यात तांत्रिक व आर्थिक बोलीच्या निविदा मागविण्यात येत आहेत. दोन वेगवेगळ्या लिफाफ्यांमध्ये मोहोरबंद निविदा जमा करण्याची अंतिम तारीख **३ सप्टेंबर २०२५** आहे. अधिक तपशीलाकरिता बँकेच्या वेबसाइट **www.punjabandsindbank.co.in** ला भेट द्या.

आंचलिक प्रबंधक, मुंबई

## जाहीर नोटीस

नगर अर्बन को. ऑप. बँक लि.(मल्टिस्टेट शेड्युल्ड बँक) अहमदनगर, पो. बॉक्स नं.७, बँक रोड, अहमदनगर या बँकेचे कामकाज मा. अवसायक साहेब यांचे अधिपत्याखाली चालु आहे. सध्या बँकेच्या थकीत कर्जाची रक्कम वसुल होऊन मिळण्यासाठी मा. अवसायक साहेब यांच्यामार्फत खाली नमुद औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) शाखेतील सोनेतारण कर्जदारांना व सोने मुल्यांकक कायदेशीर वारस यांना मल्टीस्टेट को ऑप सोसायटीज अ‍ॅक्ट २००२ मधील तरतुदीनुसार लवाद दावा पुर्व रजिस्टर पोस्टाने नोटीसा पाठविलेल्या असुन खाली नमुद कर्जदारांच्या नोटीसा न बजावता परत आल्यामुळे व त्यांचा पत्ता आढळ होत नसलेने जाहीर नोटीस देणे आवश्यक झालेले असुन सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाचे आत खाली नमुद कर्जदारांनी त्यांचेकडे असणारी थकीत कर्जाची रक्कम बँकेत जमा करावी अन्यथा बँकेस कायदेशीर तरतुदीनुसार बँकेचे नियुक्त लवाद अधिकारी यांचे समोर रक्कम वसुल होऊन मिळणेकरीता सोनेतारण कर्जदार व गोल्ड व्हॅल्युअर यांचे कायदेशीर वारस यांचे विरुध्द वैयक्तीक व संयुक्तीकरीत्या रक्कम वसुल होणेकरीता अर्ज दाखल करणे भाग पडेल याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कर्जदाराचे नाव | खाते नंबर | दि.:३१/०७/२०२५ अखेर येणेबाकी रुपये + पुढील व्याज |
|---|---|---|---|
| ०१) | श्री विजय सांडु साबळे, रा.मारुती मंदिरासमोर, एन.बा.जा/१०, बालाजी नगर, छत्रपती संभाजी नगर, ता.जि.छत्रपती संभाजीनगर | १००८०३५१००५१४ | ५,१८,४७९/- |
| ०२) | श्री गंगाधर नाथराव मुंढे, रा. प्लॉट नं.४३, ज्योती नगर, छत्रपती संभाजीनगर, ता.जि. छत्रपती संभाजीनगर रा. दशमेश नगर, छत्रपती संभाजीनगर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर | १००८०३५१००५२३ | १४,६३,८९६/- |
| | | १००८०३५१००५४६ | २६,३५,५७०/- |
| ०३) | श्री मंगेश नाथराव मुंढे – रा. दशमेश नगर , छत्रपती संभाजीनगर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर रा. पलॅट नं.१००१, त्रिमुर्ती टॉवर, सेक्टर २३, नेरुळ पश्चिम, नवी मुंबई-४००७०६ | १००८०३५१००५२५ | ११,६९,४६१/- |
| | | १००८०३५१००५४४ | २४,५७,१६२/- |
| | | १००८०३५१००५४८ | २२,४६,६१८/- |
| ०४) | श्री सुभाष सुर्यभान पवार – रा.बीड बायपास, छत्रपती संभाजीनगर, ता.जि. छत्रपती संभाजीनगर रा.४३/३/३०३, उर्जानगर, सातारा परिसर, छत्रपती संभाजीनगर, ता जि छत्रपती संभाजीनगर | १००८०३५१००५२६ | २४,६८,९३७/- |
| | | १००८०८२१०३७२८ | ४,१२,९२७/- |
| ०५) | श्री शेरखॉ चांदखॉ पठाण -रा.गल्ली नं.१४९,मु.पो. थेरगाव,ता. पैठण,जि. छत्रपती संभाजीनगर | १००८०३५१००५३२ | १०,४०,२६९/- |
| ०६) | श्री दिंगबर गंगाधर डहाळे, रा. स्वराज नगर, स.नं ५१, प्लॉट नं.३४, मुकुंदवाडी रेल्वे स्टेशन, छत्रपती संभाजी नगर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर | १००८०३५१००५४७ | २८,३१,७५२/- |
| ०७) | श्री विष्णु हरिशचंद्र हिंगे – रा.पलॅट नं.१९, केशर मणी अपार्टमेंट, देवगिरी बँकेमागे, न्यु श्रेयस नगर, छत्रपती संभाजीनगर, ता जि छत्रपती संभाजीनगर | १००८०३५१००५६७ | ५,६९,१४२/- |
| | | १००८०८२१०३५५९ | ५,१२,०४१/- |
| | | १००८०८२१०३५६० | ५,१२,०४१/- |
| ०८) | श्री दिपक सुधाकर अडाणी, रा. ७८१/५, कल्याणी नगर, पाचोड बु, ता.पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर | १००८०३५१००५७२ | १५,९८,६३१/- |
| | | १००८०८२१०३७२३ | ४,८८,३२५/- |
| ०९) | श्री. अजयसिंग विजयसिंग ठाकुर, रा.१५/२/४/११, सोनार गल्ली, मोची मोहल्ला, पदमपुरा, छत्रपती संभाजीनगर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर | १००८०८२१०३७१० | ५,१४,९०३/- |
| | | १००८०८२१०३७११ | ४,५८,२७८/- |
| | | १००८०८२१०३७१२ | ५,०२,५३८/- |
| १०) | श्री.सचिन जगन्नाथ शहाणे, रा. न्यु बालाजीनगर, छत्रपती संभाजीनगर, ता. जि.छत्रपती संभाजीनगर रा.रामसगाव, घनसावंगी. जालना, ता. जि.जालना | १००८०३५१००५३५ | ५,७३,५१६/- |
| | | १००८०८२१०३७५८ | ३,९५,७६१/- |
| | | १००८०८२१०३७५९ | २,३१,८८९/- |
| | | १००८०८२१०३७६० | २,५५,०६७/- |
| ११) | श्री.सागर विनोद अग्रवाल, रा. पिर बाजार, छत्रपती संभाजीनगर, ता.जि.छत्रपती संभाजीनगर | १००८०८२१०३७२६ | १,९४,४९५/- |
| | | १००८०८२१०३७२७ | ५,१६,९०७/- |

सदर सोने मुल्यांकक रमेश गंगाधर उदावंत हे वर नमुद सर्व सोने मुल्यांकक असून ते मयत असल्यामुळे त्यांच्या वारसांना म्हणजेच वारस १) स्वाती रमेश उदावंत (पत्नी) २) यश रमेश उदावंत (मुलगा) दोघे रा. ७४, जुनेगाव पाचोड बु।।, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर – ४३११०७ यांना ही नोटीस दिली असे. व वर नमुद कर्जदारांना जाहीर नोटीसीअन्वये बजावणी करणेत येत आहे.

अवसायक
नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.,अहमदनगर
(मल्टीस्टेट शेड्यूल्ड) , अहिल्यानगर ४१४००१

दि.: १२/०८/२०२५

ARL

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती डी.एस.तांबे मॅडम, दुसरे सह-दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातून**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक : २९७/२०२५ पुढील तारीख : १०-९-२०२५

अर्जदार – १. शरीफखर्खा महेमुदखर्खा पठाण, वय ८३ वर्षे, धंदा शेती व मजुरी, रा. गराडा तांडा, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर १- २-पठाण अहेमद महेमुद, वय ६५ वर्षे, धंदा शेती व मजुरी, रा. गराडा तांडा, ता. कत्रड, जिल्हा छ. संभाजीनगर ३- अलीखॉ महेमुदखॉ पठाण, वय ५८ वर्षे, धंदा शेती व मजुरी, रा. गराडा तांडा, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर ४- बुरय्ये हसिनाबी मनवरखॉ, वय ६५ वर्षे, धंदा शेती व मजुरी, रा. अंभई, नानेगांव ता. सिल्लोड, जिल्हा छ. संभाजीनगर ५. बीबीबी अब्दुल रहेमानखॉ पठाण, वय ७८ वर्षे, धंदा शेती व मजुरी, रा. कठोरा बाजार ता. भोकरदन, जि. जालना ६-बानोबी सांडुखॉ पठाण, वय ८० वर्षे, धंदा शेती व मज्री, रा. गराडा तांडा, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर

– विरुध्द–

गैरअर्जदार – महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद / छत्रपती संभाजीनगर

अर्ज – बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत..

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील अ‍ॅड.एस.एम.शिरसे यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असून अर्जदार यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून विदयमान न्यायालयात दाखल केला आहे. अर्जदार क्रमांक १ ते ६ ची आई नामे खातुनबी महेमुदखॉ मेवाती या दिनांक ६.१.२०१० रोजी गराडा तांडा ता. कन्नड येथे मयत झाल्या आहे. त्याच प्रमाणे अर्जदार क्रमांक १ ते ६ यांचे वडील नामे महेमुदखा नुरखों हे दिनांक १.८.२०१२ रोजी गराडा तांडा ता. कन्नड येथे मयत झाले आहे. सोबत ग्राम पंचायत गराडा तांडा ता. कन्नड यांचे कडील दोन्ही मयतांचे मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. सदरील प्रकरणात अर्जदार क्रमांक १ ते ६ हे मयताचे मुले व मुली आहेत. मयताच्या नावाने मिळणारे शासकीय व निमशासकीय फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत महसुलच्या रेकॉर्डला नोंद घेणेसाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे व ईतरही कायदेशीर कामासाठी सदरील वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे. सबब सदरील अर्ज करण्यास दिनांक ०५.०५.२०२५ रोजी कारण घडले आहे. अर्जदार १ ते ६ हे मयताचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतास कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे. अर्जदारांनी या न्यायालयात अर्जा सोबत सोबत स्वतःचे आधार कार्ड तसेच महानगर पालिका छ. संभाजीनगर यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र अवलोकनासाठी दाखल करीत आहे. मयत व अर्जदार क्रमांक १,२,३ व ६ मे. न्यायालयाचे हद्दीत राहणारे असून न्यायालयाच्या न्याय कक्षेत मुळचे राहणारे असल्याने व मयताच्या नावे असलेली शेती देखील मा. कोर्टाच्या अधिकार क्षेत्रात मी जे गराडा तांडा येथे असल्याने सदरील अर्ज चालविण्याचा व वारसाचे प्रमाण पत्र देण्याचा अधिकार मे. न्यायालयास आहे असे अर्जदारांनी त्यांच्या अर्जात नमुद केलेले आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी इंतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दिनांक १२/०८/२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले,

दिनांक : १२/०८/२०२५

आदेशावरून

लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

अग्रलेख...

# कुत्र्यांच्या हैदोसाचे गांभीर्य

१९८५ मध्ये एक चित्रपट आला होता. त्याचे नाव होते 'तेरी मेहरबानियां.' नायक होता जॅकी श्रॉफ आणि सहनायक 'ब्राऊनी' उपाख्य मोती. त्यातला मोती हा कुत्रा होता. तो नायकाला कसा साथ देतो आणि खलनायकांशी लढता-लढता शेवटी तोच कसा नायक बनतो, अशा आशयाची कथा त्या चित्रपटात होती. 'हाथी मेरे साथी', 'मैं और मेरा हाथी' असे कितीतरी चित्रपट सांगता येतील, ज्यांत प्राणी हा माणसाचा मित्र किंवा साथीदार असल्याचे दाखविले आहे. प्राण्यांच्या निष्ठेच्या कथा सांगणारी गाणी आहेत. याचे कारण आपल्या भूतदयेच्या परंपरेत दडलेले आहे. आपण नाटक-सिनेमातून माणसांना शत्रू दाखवीत आलो, पण पशूंना आपले शत्रू म्हणून फारसे चित्रित केले नाही. आता मात्र परिस्थिती बदललेली आहे. 'जब कुत्ते की मौत आती हैं तो वो शहर की ओर भागता हैं' असा एक फेमस डायलॉग आहे. परंतु, कुत्रेच मृत्यूचे दूत म्हणून हिंडू लागले आहेत. 'तुझे कुत्ते की मौत मारुंगा' असे वाक्य कित्येक नायकांनी किंवा खलनायकांनी सिनेमात वापरले. पण, सरकारी नियमांचा अडसर असल्यामुळे कुत्र्यांना मारताही येत नाही. कुत्र्यांना मात्र कुणालाही चावण्याची आणि लचके तोडण्याची मुभा आहे. त्यामुळेच दिल्लीतील कुत्र्यांना शहराबाहेर न्या, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाला द्यावा लागला. कुत्र्यांचा, त्यातही भटक्या कुत्र्यांचा प्रश्न केवळ दिल्लीपुरता मर्यादित नाही; तो संपूर्ण भारतात आहे. महाराष्ट्रात गेल्या सहा वर्षांत भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याने तब्बल ३० लाख लोक जखमी झाल्याचे सरकारी आकडेवारी सांगते. म्हणजे दररोज सुमारे १,३०० नागरिक कुत्र्यांच्या हल्ल्यांना बळी ठरतात. ही फक्त एका राज्याची स्थिती असेल तर संपूर्ण भारतात ही समस्या किती विकोपाला गेली असेल, याची कल्पना करा. रस्त्यावरून चालताना पाच-सहा कुत्र्यांचे टोळके आक्रमक नजरेने पाहत आहे आणि संधी मिळाली की तुटून पडत आहे, हा अनुभव गावागावांत सामान्य झाला आहे. दिवसाढवळ्या मुलांवर, वृद्धांवर, अगदी सकाळी फिरायला जाणाऱ्यांवर कुत्र्यांनी हल्ला केल्याच्या घटना वारंवार घडत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या अंदाजानुसार, जगभरात रेबीजमुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी तब्बल ३६ टक्के मृत्यू फक्त भारतात होतात. दरवर्षी १८ ते २० हजार लोकांचा जीव रेबीजमुळे जातो आणि त्यात बहुसंख्य बळी छोट्या मुलांचे असतात. रेबीज एकदा झाल्यावर त्यावर कोणताही इलाज नाही; त्यामुळे कुत्र्यांच्या चाव्याचा संबंध थेट मृत्यूच्या शक्यतेशी आहे. भारतात भटक्या कुत्र्यांची समस्या नवीन नाही. २००१ मध्ये एक नियमावली जारी करण्यात आली. त्यानुसार भटक्या कुत्र्यांना मारण्यास बंदी घालण्यात आली. त्याऐवजी त्यांची नसबंदी व लसीकरण करणे एवढेच यंत्रणांच्या हातात उरले. या धोरणामागे प्राणी हक्कांचा सन्मान, अनावश्यक हिंसा टाळणे आणि दीर्घकाळात कुत्र्यांची संख्या नैसर्गिकरीत्या कमी करणे हा उद्देश होता हे खरे आणि योग्यही. परंतु, आता लक्षात येते आहे ते असे की, कुत्र्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढते आहे आणि कुणाच्याही अंगावर कुत्री धावून जात असल्याच्या घटनांमध्येही सतत वाढ होते आहे. कुत्र्यांच्या जगण्याच्या अधिकाराला मान्यता देणाऱ्या नियमाच्या अंमलबजावणीत सरकार आणि त्याच्या सर्व यंत्रणा सपशेल अपयशी ठरल्या. महानगर पालिका, नगर पालिका, जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडे आवश्यक निधी, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधा नाहीत. परिणामी, कुत्र्यांच्या नसबंदीच्या मोहिमा अपुऱ्या राहतात. एकेका शहरात सर्व कुत्र्यांची नसबंदी करतो म्हटले तर सध्याची गती आणि संसाधने यांचा विचार केला तर हे काम पूर्ण करायला किती तरी वर्षे लागतील आणि तोपर्यंत कुत्र्यांची संख्या दुप्पट-तिप्पट किंवा त्याहून अधिक झालेली असेल. त्यामुळे यावर तातडीने व वेगवान उपाय जरुरी आहेत.

भटक्या कुत्र्यांचा विषय चर्चेत आला की समाज दोन गटांत विभागला जातो, हेही नेहमीचे. एक गट प्राणिप्रेमींचा. त्यांचा असा ठाम विश्वास असतो की, कुत्रे हिंस्र होत नाहीत; माणसांचे वर्तन, उपासमार किंवा छळ यामुळेच ते आक्रमक होतात. नसबंदी, लसीकरण आणि नागरिकांना योग्य वर्तनाचे प्रशिक्षण हाच यावरील उपाय असे त्यांचे मत. कुत्र्यांना मारणे अमानुष आहे आणि मानवी सभ्यता अशा कृत्याला मान्यता देऊ नये, असा त्यांचा युक्तिवाद. दुसरा गट मानवी सुरक्षिततेला प्राधान्य देणाऱ्यांचा. त्यांच्या मते, एखाद्या प्राण्याचा जीव वाचवण्यासाठी मानवी जीव धोक्यात घालणे ही दांभिकता. रेबीजसारख्या रोगाची भयावहता, लहान मुलांच्या मृत्यूंचे आकडे आणि वृद्धांवर झालेले घातक हल्ले पाहता, कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर उपाय आवश्यक आहेत. खरे तर भारताने यातला भावातिरेक टाळून जगात काय चालले आहे, हेही पाहिले पाहिजे. सिंगापूरमध्ये भटक्या कुत्र्यांना लगेच पकडून त्यांची आरोग्य तपासणी केली जाते. दत्तक देता येत नसेल किंवा योग्य ती सोय करता येत नसेल तर त्यांना शांतपणे मृत्यू दिला जातो. परिणामी, रस्त्यावर भटक्या कुत्र्यांची संख्या नगण्य आहे. ऑस्ट्रेलियात भटक्या कुत्र्यांवर कठोर कारवाई केली जाते. युरोपातील बहुतेक देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर नसबंदी आणि दत्तक कार्यक्रम चालविले जातात. त्याचबरोबर पाळीव प्राण्यांच्या नोंदणीसाठी आणि जबाबदारीसाठी नागरिकांना जबाबदार धरणारे कठोर कायदे आहेत. भारतात नियम आहेत, पण यातले काहीही होत नाही. लोकसंख्या प्रचंड आहे. शहरांतील कचरा व्यवस्थापन अत्यंत निकृष्ट आहे आणि पाळीव प्राणी सोडून देण्याची सवय अजूनही रूढ आहे. भटक्या कुत्र्यांचा परिणाम केवळ माणसांवरच नव्हे तर पर्यावरणावरही होतो. कुत्रे जंगली भागात जाऊन हरिण, काळवीट, नीलगाय यांसारख्या प्राण्यांवर हल्ले करतात. ते पक्ष्यांची अंडी, संकटग्रस्त कासवांची पिलेदेखील खातात. त्यामुळे स्थानिक जैवविविधतेला धोका निर्माण होतो. ऑस्ट्रेलियात कुत्र्यांबद्दल जी ठोस कारवाई होते, त्यामागे जैवविविधता हे महत्त्वाचे कारण आहे. भारतात कायदा साथीला नाही आणि कुत्र्यांना आवर घालण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे पैसाही नाही. नसबंदी आणि लसीकरण मोहिमा मोठ्या प्रमाणावर राबविण्यासाठी लागणारा निधी स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळत नाही. त्यांना फक्त नियमानुसार कुत्रे सांभाळण्याची (किंवा त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्याची) जबाबदारी तेवढी मिळालेली आहे. कुत्र्यांना सुरक्षितपणे पकडणे, लसीकरण करणे यासाठी प्रशिक्षित पथकांची पुरेशी व्यवस्था नाही. पाळीव कुत्र्यांची नोंदणी बंधनकारक असूनही बहुतेक मालक नोंदणी करीत नाहीत. उघड्यावर टाकलेला कचरा कुत्र्यांसाठी खाद्याच्या स्वरूपात सहज उपलब्ध असल्याने त्यांचे जीवनमान सुधारते आणि त्यांची संख्या वाढते. या प्रश्नावर भावनिकतेच्या पलीकडे जाऊन व्यावहारिक उपाय केले पाहिजेत. त्यातील पहिला उपाय आहे जलद नसबंदी व लसीकरण आणि दुसरा म्हणजे कुत्र्यांसाठी शहरांच्या बाहेर शेल्टर्स. हे काम केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अखत्यारीत न ठेवता, राज्य आणि केंद्र सरकारने थेट निधी देऊन त्यात खाजगी पशुवैद्यक संस्थांनाही सामील करून घेतले पाहिजे. पाळीव कुत्रा सोडून दिल्यास किंवा नोंदणी न केल्यास मोठा दंड आणि शिक्षा करण्याच्या तरतुदी गरजेच्या आहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे- भटक्या कुत्र्यांचा प्रश्न हाताळताना मानवी सुरक्षितता हा प्राधान्याचा विषय असायला हवा. एखादा लहान मुलगा शाळेत जाताना कुत्र्याच्या हल्ल्याचा बळी ठरतो आणि एखादी वृद्ध व्यक्ती रक्तबंबाळ होऊन रुग्णालयात दाखल होते, या घटनांकडे पाहताना भूतदया बाजूला ठेवावीच लागेल. प्राण्यांशी निर्दयतेने वागणे सभ्य समाजाला शोभत नाही, हे खरेच. पण, कुठे तरी समतोल हवाच. या प्रश्नावर जेव्हा केव्हा चर्चा होते तेव्हा केंद्र, राज्य आणि स्थानिक संस्था एकमेकांवर जबाबदारी ढकलतात. एखादी भयंकर घटना घडली की, 'हा विषय आमच्या अधिकारात नाही' असे सांगून मोकळे होण्याची भारतात पद्धतच आहे. तेच कुत्र्यांच्या बाबतीत सुरू आहे. त्यामुळे आधीच असंख्य समस्यांनी त्रस्त असलेल्या भारतीयांना गल्लीबोळात, रस्त्यावर कुत्र्यांचा हैदोस किती काळ सहन करावा लागेल आणि किती जणांचे जीव गेल्यावर सरकारी यंत्रणांना जाग येईल, हे सध्या तरी कुणालाही सांगता येणार नाही.

प्रासंगिक

- संकेत कुलकर्णी (लंडन)

# '११ ऑगस्ट २०२५' इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा दिवस

नागपूरच्या रघोजी भोसले (प्रथम) ह्यांची राज्यशासनाने लिलावात विकत घेतलेली तलवार भारतात पुन्हा नेण्यासाठी आपल्याकडे सुपूर्द करण्यात आली. ही घटना विशेष कारण आपल्या देशाच्या इतिहासांत हे पहिल्यांदाच घडत होतं. २९ एप्रिल रोजी महाराष्ट्र राज्यशासनाने विशेष व्यवस्था करून लंडनमधे एका जाहीर लिलावात भाग घेतला आणि एका शासनमान्य मध्यस्थाद्वारे ही तलवार विकत घेतली. ती तलवार ताब्यात घेण्यासाठी महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्री ड आशिष शेलारसाहेब आणि पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय खात्याचे उपसंचालक हेमंत दळवी लंडनला आले होते. ह्या तलवारीचा भारतात पाठवायच्या आधी स्थिती परीक्षण अहवाल बनवला जाणार होता आणि त्यासाठी मला पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय ह्यांच्याकडून आमंत्रण होतं. ही तलवार ठेवली होती लंडनच्या उत्तरेला 'वारे' नावाच्या गावातल्या एका वेअरहाऊसमधे. शुक्रवारी मी आणि दळवीसाहेब जाऊन तलवारीची पाहणी करून आणि मोजमापं वगैरे घेऊन आलो होतो. संदर्भ म्हणून काही फोटोजही काढले होते. सोमवारी सकाळी शेलारसाहेब व भारतीय दूतावासाचे काही अधिकारी ह्यांच्यासोबत शेवटची पुन्हा एकदा पाहणी करून ती तलवार ब्रिटीश कस्टम्सकडे सोपवायची होती. शेलारसाहेबांसोबत सकाळी ९ वाजता आम्ही त्या तलवार ठेवलेल्या वारेला पोहोचलो. बाहेर गर्दी होती पण आतमध्ये जास्त लोकांना प्रवेश नव्हता. हातमोजे घालून आम्ही पुन्हा एकदा मापं व फोटो घेतले. शेलारसाहेबांनी छोटंसं भाषण केलं व संबंधित लोकांचे आभार मानले. साहेबांना आम्ही तलवारीचे बारकावे समजावून सांगितले. आणि सकाळी १० वाजता ती तलवार पॅक होऊन ब्रिटीश कस्टम्सच्या ताब्यात आम्ही सुपूर्द केली.

वारेहून लंडनला परत येताना शेलारसाहेबांनी सावरकरांच्या इंडीया हाऊस बद्दल चौकशी केली. इंडीया हाऊस व डॉ. आंबेडकरांचं लंडनमधलं घर १५ मिनीटांच्या अंतरावर आहे असं समजताच आम्ही



साहेबांनी तिथे जायची इच्छा दर्शवली. सावरकरांच्या 'इंडीया हाऊस'चं दर्शन घेतलं. श्यामजी कृष्ण वर्मा व त्यांच्या कार्याचा इतिहास साहेबांना सांगितला. इंडीया हाऊसची वैशिष्ट्यं व १९०५ सालच्या उद्घाटनाच्या वेळचे प्रसंग त्यांना सांगितले. तिथून पुढे आम्ही डॉ आंबेडकरांच्या घराकडे जायला निघालो. जेव्हा २०१५ मधे बाबासाहेबांचं लंडनमधलं घर लिलावात निघालं होतं तेव्हा शेलारसाहेब पहिले आमदार होते ज्यांनी केंद्रात अरूण जेटलींना हे घर घेता येईल का ह्याबद्दल चौकशी करायला सुचवलं होतं. शेलारसाहेबांनी तो संपूर्ण घटनाक्रम आम्हाला सांगितला. बाबासाहेबांसमोर नतमस्तक होऊन आम्ही लंडनमधल्या भारतीय दूतावासाकडे निघालो. तिथे भारतीय उच्चायुक्त विक्रम दोराईस्वामींसोबत पुढची मिटींग होती. दोराईस्वामींसोबत भरपूर गप्पा झाल्या. लंडनमधे विक्रीला येत असलेल्या पुरातन भारतीय वस्तूंबाबत काय करता येईल ह्याबद्दल चर्चा झाली. इथल्या संग्रहालयांत किंवा प्रायव्हेट कलेक्शनमधे असणाऱ्या गोष्टींबाबत काय करता येईल हाही विषय झाला. (बाकी गोपनीय विषय झाले - यथावकाश त्यांवर काम होईलच - त्यांबद्दल इथे लिहून शकत नाही!) त्यांचा निरोप घेऊन पुढे निघालो. यापुढची मिटींग व्हिक्टोरिया ल्बर्ट वस्तुसंग्रहालयाच्या संचालकांसोबत होती. एकूणच संग्रहालये हा माझा आवडता विषय. आपल्याकडे असलेली महाराजांची वाघनखं त्यांनीच सध्या कराराने दिलेली आहेत. त्यांच्यासोबत नव्या संग्रहालयांबद्दल चर्चा झाली. मुंबईत नवं संग्रहालय विकसित करायला ते काही करू शकतात का व त्यान्वये अजून काही 'आपल्या' गोष्टी भारतात येऊ शकतात का ह्याबद्दल बोलणी झाली. (बाकी गोपनीय विषय झाले - यथावकाश त्यांवर काम होईलच - त्यांबद्दल इथे लिहून शकत नाही!) त्यांनी आम्हाला त्यांच्या टेक्स्टाईल कन्झर्वेशन विभागाची एक छोटी सहल घडवली. आणि आम्ही बाहेर पडलो.

सकाळी ६ वाजता सुरु झालेला दिवस. सतत प्रवास व मिटींग्जची धावपळ रात्री १०-१०:३० वाजता संपली. दिवसभर शेलारसाहेब व दळवीसाहेब ज्या झपाट्याने कामं करत होते ते पाहून खरंच आश्चर्य वाटलं. त्यांच्या चेहऱ्यावर थकव्याचा लवलेशही नव्हता. ब्रेकफास्टपासून रात्रीच्या जेवणापर्यंत आम्ही एकत्र होतो. अवांतर गप्पाही भरपूर झाल्या. मुंबईत आल्यावर भेटीचे वायदे झाले आणि मग मी घरी जायला निघालो. परतीच्या ट्रेनमध्ये विचार करत होतो - काळ कसा बदलला आहे पहा. जगभरात पूर्वीपासून हे असे भारतातून चोरून नेलेल्या गोष्टींचे लिलाव होत आलेले आहेत. तेव्हा आपण देश किंवा सरकार म्हणून निषेध व्यक्त करण्यापलीकडे काहीच फारसं केलं नाही. पण पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखालील नवीन भारत मात्र आता ह्या अश्या भारतातूनच चोरून नेलेल्या वस्तूंची जगाकडे आशाळभूतपणे भीक मागत नाहीये, तर सरळ त्या बाजारभावाने विकत घेऊन सन्मानाने भारतात पुन्हा परत घेऊन जातोय - हा किती मोठा सकारात्मक बदल आहे. अश्या अनेक गोष्टी भविष्यात भारतात पुन्हा आणल्या जातीलही पण त्याची सुरुवात ह्या तलवारीपासून झाली. आणि तोच हा कालचा दिवस. ह्या अश्या ऐतिहासिक दिवसाचा प्रत्यक्ष साक्षीदार व्हायचं भाग्य मला लाभलं ह्यातच मी कृतकृत्य!

वेध

गिरीश शेरेकर

# अमरावती पानमसाला, गुटख्याची राजधानी

अमरावती शहर व जिल्हा विदर्भाची सांस्कृतिक राजधानी म्हणून जसा ओळखला जातो तसाच तो आता प्रतिबंधित पानमसाला व गुटख्याची राजधानी म्हणून नावारूपास आला आहे. अलिकडच्या काळातल्या काही घटना तर अमरावतीच्या सांस्कृतिकपणाला कलंकित करणाऱ्या ठरल्या आहेत. सांस्कृतिकपणाचे हे बिरुद नामशेष होण्याची भीती मनात असतानाच गुटख्याच्या चक्रव्यूहात अमरावती अडकली आहे. गुटखा, तंबाखू मिश्रित पानमसाल्याचे सेवन मानवी शरीरातल्या प्रत्येक अवयवावर प्रचंड दुष्परिणाम करते. वैद्यकीय क्षेत्रातल्या वेगवेगळ्या संशोधनातून ते समोर आले आहे. विशेषत्वाने युवा पिढीवर त्याचे गंभीर परिणाम होत असल्याने राज्य सरकारने २०१२ पासून गुटखा व पानमसाला विक्री, उत्पादन, वितरण, साठवणुकीवर बंदी घातली आहे. ही बंदी कितपत यशस्वी झाली, याचे उत्तर राज्य शासनाच्या अन्न व औषध प्रशासन विभागाने आजपर्यंत दिले नाही. राज्यकर्त्यांनी सुद्धा छाती ठोकून ते कधी सांगितले नाही. राज्यातल्या कोणत्याही शहरात व गावात फेरफटका मारल्यावर लक्षात येते की, बंदी फक्त कागदावरच आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकलच्या संशोधनातून वेळोवेळी गुटखा व तंबाखूचे गंभीर वास्तव समोर आल्यानंतरही शासन व प्रशासन जनजागृतीच्या पलीकडे काहीच करायला तयार नाही, याचे प्रचंड आश्चर्य आहे. राज्यातले एकही असे गाव नाही की, जेथे गुटखा व पानमसाला मिळत नाही. बंदी घालण्यापूर्वी जी स्थिती अमरावतीसह पश्चिम विदर्भातल्या अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये होती तीच आजही कायम आहे. बंदीनंतर काही वर्ष नागपूरसह पूर्व विदर्भातल्या जिल्ह्यांमध्ये गुटखा फारसा मिळत नव्हता. कारण, याच काळात नागपुरी खर्र्याने अनेकांच्या मनात राज्य केले होते. आता नागपुरी खर्र्याची भीषणता पदोपदी समोर येत असल्याने गुटखा व पानमसाला नागपूरसह वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये सहज मिळायला लागला आहे. परिणाम मात्र दोघांचेही सारखेच आहेत. हीच स्थिती राज्यातल्या अन्य जिल्ह्यांमध्ये आहे. अमरावती तर गुटखा व पानमसाला तस्करीचे, वाहतुकीचे, निर्मितीचे मुख्य केंद्रच झाले आहे. विशेष म्हणजे गुटख्याचे अनेक नवे ब्रॅण्ड अमरावतीत तयार झाले असून विदर्भासह राज्याच्या कानाकोपऱ्यात बिनबोभाटपणे पोहोचत आहे. अमरावती मुख्य केंद्र होण्यासाठी लगतचे मध्य प्रदेश कारणीभूत ठरले आहे. तिथे बंदी नसल्याने धारणी, बहिरम, पांढुर्णा या तीन व अकोला मार्गाने मोठ्या प्रमाणात गुटखा व पानमसाला अमरावतीत येतो. अचलपूर, वरुड, धारणी, चांदूर बाजार, अंजनगाव, मोर्शीत तो साठविला जातो. येथून तो अन्य जिल्ह्यांमध्ये वितरित होतो. सांगायचा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, मध्य प्रदेशसह देशातल्या अन्य भागातला ब्रॅण्ड म्हणून ओळखला जाणारा गुटखा व पानमसाला अमरावती जिल्ह्यातच हुबेहूब बनावट तयार केला जातो. अत्यंत निकृष्ट साहित्य त्यात वापरले जाते. मूळ कंपनीच्या गुटखा व पानमसाल्याच्या पुड्यांसोबत सरमिसळ करून तो विकला जातो. विदर्भासह राज्यातल्या अन्य भागांत जो काही गुटखा व पानमसाला विकला जातो, त्यातला बहुतांश माल अमरावतीत तयार झालेला असतो, असे सांगितले जाते. कोट्यवधीची ही उलाढाल असल्याने अमरावतीला राजधानीचा दर्जा मिळाला आहे.



उपरोक्त माहिती काही गुपित नाही. ते उघड सत्य असून संबंधित विभागाचे अधिकारी व पोलिसांना त्याची कल्पना आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाकडे मनुष्यबळाची कमतरता आहे आणि पोलिसांना त्यांचा दैनंदिन व्याप आहे. याचाच फायदा गुटखा किंग घेत आहेत. अर्थात त्यांना छुप्या पद्धतीने राजकीय पाठबळ असल्याने त्यांचे फावत आहे. दिवसागणिक अतिशय गंभीर होत चालेली गुटख्याची समस्या अनेकांच्या जीवावर उठली आहे. गेल्या पाच वर्षात मुख कर्करोगाचे सर्वाधिक रुग्ण अमरावतीसह पश्चिम विदर्भातल्या अन्य जिल्ह्यांमध्ये आढळले आहेत. नागपूर विभागासह राज्यातल्या अन्य भागांतही प्रमाण वाढले आहे. अनेकांचे मृत्यू झाले असून अन्य आजार देखील बळावत आहेत. तरी सुद्धा या समस्येकडे संवेदनशीलपणे पाहण्याची कोणाची तयारी नाही. आता तर गुटख्या इतकेच एमडी व इतर अमली पदार्थ प्रत्येक शहरात सहजतेने मिळायला लागले आहे. कागदावरच्या गुटखाबंदीने महसूल बुडण्याचा संताप नाही पण, दुर्धर आजाराचे परिणाम भोगावे लागत असल्याचे दुःख आहे. तस्करी असल्याने गुन्हेगारी वाढत आहे. खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच या प्रकरणात लक्ष घालण्याची गरज आहे. इतर विषयांप्रमाणे या विषयातली साखळी त्यांनी समजून घेतली तरच मुळापर्यंत जाता येईल. चांगल्या परिणामाची प्रतीक्षा करूया!

९४२०७२१२२५

धर्म-संस्कृती

प्रा. दिलीप जोशी

# श्रीगीता : ज्ञानकर्मसंन्यास योग

श्रीमद्भगवद्गीतेचा चौथा अध्याय ज्ञानकर्मसंन्यास योग नावाने परिचित आहे. आत्मस्वरूपाच्या सत्य ज्ञानाने साधक सर्वकर्मसंन्यास स्थिती प्राप्त करू शकतो, असे भगवान अर्जुनास सांगतात.

**'ज्ञानेन कर्मसंन्यासः इति ज्ञानकर्मसंन्यासः ।'**

ज्ञान प्राप्त झाले तर मनुष्य कर्मामध्ये निवृत्त होत जातो म्हणून हा ज्ञानकर्मसंन्यासयोग आहे.

तिसऱ्या अध्यायात कर्ममीमांसा सांगताना जिज्ञासूंनी निष्काम वृत्तीने कर्म केले पाहिजे; याला नैष्कर्म अवस्था म्हटले आहे. चौथ्या अध्यायात भगवान ज्ञानाचा महिमा सांगताना सद्गुरूंच्या मार्गदर्शनात कर्मत्याग न करताही निष्काम कर्म करणे याला निवृत्ती अवस्था म्हणतात. एका अर्थाने हा कर्मसंन्यास आहे. वैराग्य भावाने केलेले कर्म अर्थात कर्मात गुंतून न राहता कर्म करणे. त्याच वेळी ज्ञानासाठीचे अनुष्ठान सुरू ठेवायचे. सद्गुरूंच्या अनुग्रहाने ज्ञानग्रहण सुरू असताना ज्ञानप्राप्ती होईपर्यंत कर्मत्याग न करता निष्काम कर्मयोगाचे अनुष्ठानही सिद्ध करावे, असे भगवंताचे तात्पर्य आहे. ज्ञानप्राप्ती झाली तर आपल्याला आपल्या 'स्व'ची जाणीव होते. त्यामुळे कर्मात संन्यस्त वृत्ती येते म्हणून हा ज्ञानकर्मसंन्यासयोग आहे. या अध्यायात भगवंताने निर्माण केलेल्या सनातन धर्माविषयी वैशिष्ट्ये सांगितली आहेत. सनातन धर्म मनुष्यनिर्मित नसून तो ईश्वरनिर्मित आहे. सनातन ज्ञान हे गुरुशिष्य परंपरेने आले असून श्रीगुरुकृपेनेच यथार्थ ज्ञान प्राप्त होते. गुरुशिष्य परंपरा सांगताना भगवंत चौथ्या अध्यायाचा प्रारंभ करतात.

**'इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ।<br>विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ।'**

मी हा योग कल्पारंभी विवस्वानाला म्हणजे भगवान सूर्यनारायणाला सांगितला. विवस्वान सूर्यनारायणाने हा योग आपला पुत्र मनूला आणि मनूने आपला पुत्र इक्ष्वाकूला सांगितला. या परंपरेने प्राप्त योग राजर्षींनी जाणला होता. परंतु कालांतराने हा योग लुप्त झाला. अर्जुना! तोच योग मी तुला सांगतो आहे. कारण तू माझा सखा आहे. म्हणून हा अत्युत्तम आणि अत्यंत गुह्य असा योग मी तुला सांगतोय. ज्ञानाची गुरुशिष्य परंपरा स्वतः भगवंतांनी विशद केली. हे ऐकल्यावर अर्जुन त्या ठिकाणी भगवंताजवळ शंका विचारतात की, सूर्याचा जन्म तर कितीतरी आधी झालेला आणि तुम्ही तर आता जन्माला आले. मग हा योग कल्पारंभी तुम्हीच सांगितला असे मी कसे मानू? भगवंत म्हणतात-

**'बहूनि मे व्यतीतानि जन्मानी तव चार्जून ।<br>तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ॥'**

हे अर्जुना, माझे आणि तुझेही अनंत जन्म होऊन गेले आहेत. फक्त तुला ते आठवत नाहीत, पण मला सर्वांची जाणीव आहे. खरं तर, मी जन्मरहित, अविनाशी आणि जीवसृष्टीचा अधिपती आहे. तरीदेखील मी प्रकृतीच्या स्वाधीन होऊन योगमायेने जन्म घेतो. जन्म का घेतो, याचेही उत्तर भगवंत देतात.

**'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।<br>अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥<br>परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।<br>धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥'**

हे धनंजया, ज्यावेळी धर्माला ग्लानी येते, अधर्म बोकाळू लागतो त्यावेळी मी अवतीर्ण होतो. साधूंचे रक्षण, दुष्टांचे निर्दालन करून धर्म संस्थापनेसाठी मी जन्म घेतो. भूतलावरील जो जीव माझ्या अवताराचे महत्त्व जाणतो तो उच्चकोटीचा साधक बनतो. तो पुन्हा जन्माला येत नाही तर माझ्याच स्वरूपाला प्राप्त होतो.

**'ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम् ।<br>मम वत् र्मानुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥'**

जे भक्त ज्या इच्छेने मला भजतात मी त्यांना तसेच फळ देतो, हे सांगून भगवान सांगतात की, सर्व जीव सर्वार्थाने माझ्याच मार्गाचे अनुसरण करतात.

**'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं, गुणकर्मविभागशः ।'**

हा सुप्रसिद्ध श्लोक भगवंतांनी अर्जुनाला सांगितला की चातुर्वर्ण्य मीच निर्माण केला, पण तो गुण आणि कर्माच्या आधारे. हा अत्यंत महत्त्वाचा श्लोक असून चातुर्वर्ण्य हा कायम चिकटलेला नसून तो गुण आणि कर्मावर अवलंबून असे.

**'शूद्रोपि गुणसंपनौ विद्वान ब्राह्मणो भवेत ।'**

एखादा जातीने शूद्र असेल, पण तो गुणसंपन्न असेल तर तो ब्राह्मण आहे. एखादा जातीने ब्राह्मण आहे, पण तो पापकर्म करीत असेल तर तो शूद्र ठरतो. म्हणून भगवंतांनी त्या काळात वर्ण व्यवस्था जन्मजातीवर नसून ती गुण आणि कर्मावर असल्याचे स्पष्ट केले. पुढे भगवान हेही स्पष्ट करतात की, 'मी वर्णव्यवस्थेचा निर्माता असूनही मी अकर्ता आहे.'

'न मे कर्मफले स्पृहा ।' 'तरुण भारत'चे हे ब्रीदवाक्य याच अध्यायातील आहे. मला कर्मफळात स्पृहा नसल्यामुळे कर्म मला चिकटत नाहीत; तद्वतच तुमचेही होऊ शकते. फक्त त्यासाठी माझे ज्ञान महत्त्वाचे आहे. भगवंतांनी कर्म, अकर्म आणि विकर्म विचारही त्याला समजावून सांगितला. जो कर्मामध्ये अकर्म आणि अकर्मामध्ये कर्म पाहतो तो खरा ज्ञानी; तोच खरा योगी आणि तोच खरा कर्म संन्यासी.

थोडक्यात ज्ञानकर्मसंन्यास सांगताना आत्मस्वरूपाचे ज्ञान झाले तर आपण सर्वकर्मसंन्यास अवस्थेपर्यंत पोहोचू शकतो. या अध्यायात ज्ञानाचे महिमान सांगताना ज्ञानप्राप्तीत सद्गुरूंचे महत्त्वही सांगितले आहे. शेवटच्या श्लोकात भगवान सांगतात की, हे अर्जुना! अज्ञानाने निर्माण झालेल्या अंतःकरणातील आत्म्याविषयीच्या संशयाला ज्ञानखड्गाने छेदून समत्वबुद्धीरूप योगामध्ये स्थिर हो आणि युद्धासाठी तयार हो!

भगवान युद्धासाठी प्रवृत्त करताहेत म्हणजे कर्तव्यभाव सांगताहेत. कर्मयोगाच्या मतीने केलेले कर्तव्य हे आत्मोन्नतीचा मार्ग प्रशस्त करते. हाच कर्म संन्यास आहे.

सद्गुरूंच्या कृपेने स्व-स्वरूपाचे ज्ञान झाले आणि कोण मी? याची जाणीव झाली म्हणजे ज्ञान प्राप्ती झाली. असे ज्ञान एकदा मिळाले की आपले नित्यकर्म हे कर्म राहत नाहीत. तो फक्त सोपस्कार बनतो. म्हणजे त्या कर्मात आपण कर्म संन्यस्त बनून कर्म करतो. 'ज्ञानेन कर्म संन्यासः !' म्हणून हा ज्ञानकर्मसंन्यासयोग!

९८२२२६२७३५

## मोकाट जनावरांचा रहदारीला अडथळा

एक जुलै रोजी नांदेड मधील पुंडलिक वाडीत घडलेली घटना.एका शाळकरी मुलाला बैलाने शिंगावर घेतले. त्याला खाली पाडून जखमी केले.अशा प्रकारच्या घटना सोलापुरातही घडू शकतात,कारण सोलापूर- विजापूर रोडसह इतरही ठिकाणी मोकाट जनावरांमुळे वाहतुकीचा कोंडमारा होत आहे. येथे मोकाट जनावरांच्या वाढत्या वर्दळीमुळे, पादचारी,वाहनधारक,विशेषतः लहान मुले व ज्येष्ठ नागरिक हैराण झाले आहेत.रस्ता ओलांडताना त्यांना तारेवरची कसरत करावी लागते. दुपारपर्यंत गाई- गुरांची संख्या थोडी कमी असते; पण जस- जशी रात्र होईल तस- तशी ही संख्या वाढतच जाते. गायींचा उपयोग दुधापुरता करुन घेऊन त्या गाईंना मोकाट सोडले जाते की काय? असा संशय व्यक्त केला जातोय. तरी अशा प्रकारे गैरप्रकार करणाऱ्यांचाही शोध घ्यावा आणि



या मोकाट गायी-गुरांचा बंदोबस्त करुन, रहदारीला रस्ते खुले करुन द्यावेत,अशी मागणी या परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

**- अरुण बा. धुमाळ, सोलापूर**
**९८९०९०२९२३**

वाचक पत्रे

## नागपूर-पुणे वंदे भारत

आजपर्यंत नागपूर येथून पुण्याकडे जाणाऱ्या गरीबरथ, नागपूर-पुणे, आझाद हिंद एक्सप्रेस आणि अजून एक-दोन अशा रेल्वे उपलब्ध होत्या. या गाड्या कायम विद्यार्थी, नोकरदार वर्ग किंवा मध्यमवयीन पालकांनी भरलेल्या असतात. कारण बऱ्याच जणांची मुले-मुली या ना त्या कारणाने पुण्यात आहेत. हीच नड लक्षात घेता विदर्भातील जनतेसाठी वंदे भारत ट्रेन नुकतीच सुरू झाली आहे. मुख्यमंत्र्यांच्या प्रयत्नांनी अद्ययावत, सर्व सुविधांनी युक्त संपूर्ण वातानुकूलित अशी ट्रेन अवघ्या १२ तासात आता पुण्याला पोहोचते. पंतप्रधानांनी हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ केला. मुख्य थांब्यांवर ही ट्रेन थांबणार आहे. जसे वर्धा, बडनेरा, अकोला, शेगाव, जळगाव आणि दौंड इत्यादी थांबे आहेत. मुख्य म्हणजे विदर्भातून शेगाव येथे नियमित जाणारे अनेक भाविक आहेत. त्यांच्यासाठी ही ट्रेन लाभदायक आहे. यामुळे इतर गाड्यांची गर्दी थोडी होईल. फक्त यात गैरफायदा असा आहे की,



तिकिटाचे दर जास्त पडतात आणि नागपूर-पुणे-नागपूर या दोन्ही वेळी प्रवासाची वेळ संपूर्ण दिवसभराची असल्यामुळे विद्यार्थ्यांचे अथवा नोकरदारांचे दोन दिवस अतिरिक्त वाया जातील. त्यामुळे या वेळांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तरीदेखील छोट्या प्रवासासाठी किंवा प्रवासाची मजा लुटण्यासाठी एक छान अनुभव कधी घ्यायला काहीच हरकत नाही. ही ट्रेन सुरू केल्याबद्दल राज्य सरकारचे अभिनंदन.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

## नौदलाची ताकद वाढणार

भारतीय नौदलाच्या ताफ्यात उदयगिरी (एफ ३५) आणि हिमगिरी (एफ ३४) या दोन युद्धनौका एकाच वेळी समाविष्ट होणार असल्याने भारतीय नौदलाची ताकद कैकपटीने वाढणार आहे. भारत-पाकिस्तानमधील तणावाच्या पृष्ठभूमीवर या युद्धनौका नौदलाच्या ताफ्यात समाविष्ट होत असल्याने पाकिस्तानचे धाबे दणाणले आहे. या युद्धनौका डिझेल किंवा गॅस प्रपोल्शन प्लांटद्वारे चालवल्या जाऊ शकतात. यात सुपरसॉनिक क्षेपणास्त्रे, मध्यम श्रेणीची हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे, ७६ मिमी एमआर तोफा, ३० मिमी आणि १२.७ मिमी क्लोज इन वेपन सिस्टिम आणि अँटी सबमरीन पाण्याखालील शस्त्र प्रणालींचे संयोजन करण्यात आले आहे. या दोन्ही नौका भारतीय बनावटीच्या आहेत तसेच त्या भारतातच बांधण्यात आल्या आहेत. मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत उपक्रम संरक्षण क्षेत्रात यशस्वी होत असल्याचेच हे निदर्शक आहे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# कलश फाउंडेशनतर्फे एकल महिलांच्या दोनशे पाल्यांना शालेय साहित्य प्रदान

## मुलांना शिकवण्याची धडपड हेच एकल महिलांचे खरे सामर्थ्य – रीता मैत्रेवार





तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

जालना एज्युकेशन फाउंडेशनच्या संकल्पनेतून कलश सीड्स फाउंडेशनच्यावतीने एकल महिला आणि आई–वडील नसलेले अशा २०० पाल्यांना शालेय साहित्याच्या किट्स प्रदान करण्यात आल्या. स्कूल बॅग, वॉटर बॉटल, टिफिन बॉक्स, रजिस्टर, इंग्रजी शब्दार्थ डिक्शनरी, कंपास, पेन सेट या साहित्याचा त्यामध्ये समावेश आहे.

कलर सीड्सच्या सभागृहात मंगळवार दि. १२ ऑगस्ट रोजी सायंकाळी शालेय साहित्य किट प्रदान सोहळा अपर जिल्हाधिकारी श्रीमती रीता मैत्रेवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. अध्यक्षस्थानी जालना एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष सुनील रायठठ्ठा हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून रोटरीचा सर्वोच्च अबाव सर्विस सेल्फ जागतिक पुरस्कार प्राप्त उद्योजक अरुण अग्रवाल, जिल्हा बालसंरक्षण अधिकारी गजानन इंगळे हे होते. व्यासपीठावर कलश सीड्सचे चेअरमन सुरेश अग्रवाल, व्यवस्थापकीय संचालक समीर अग्रवाल, संचालिका सौ. वर्षा अग्रवाल, जालना एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी, विश्वस्त प्रा. झांजरी यांची उपस्थिती होती. यावेळी रीता मैत्रेवार म्हणाल्या की, एकल महिला अत्यंत मोठा संघर्ष करून, प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, आपल्या मुलांच्या भविष्यासाठी धडपडत आहेत. ही धडपडच त्यांचे खरे सामर्थ्य आहे. काही जण फक्त स्पर्धा करत राहतात, पण आयुष्यात अशी जिद्द ठेवा; जी स्वतःला इतकं लायक बनवते की स्पर्धा आपोआप संपते, असे सांगून कलश फाउंडेशनच्या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले.

जिल्हा बाल संरक्षण अधिकारी श्री. इंगळे यांनी एकल पालकांच्या पाल्यांसाठी असलेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई बाल संगोपन योजनेची माहिती दिली. या योजनेअंतर्गत प्रतिपाल्य २२०० रुपये मिळतात असे ते म्हणाले व अर्ज करण्याची प्रक्रिया स्पष्ट केली. कलश सीड्सच्या संचालिका वर्षा अग्रवाल म्हणाल्या की, एकल पालक महिलांचा संघर्ष हा केवळ स्वतःच्या जगण्यापुरता मर्यादित नसतो, तर तो आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी असतो. घराची जबाबदारी, आर्थिक संघर्ष आणि समाजातील आव्हाने पेलताना त्या आई व वडील या दोन्ही भूमिका निभावतात. अशा मातांची साथ ही आपली सामाजिक बांधिलकी आहे. शैक्षणिक साहित्य वाटप ही आमची छोटीशी मदत असून, यापुढेही करत राहू. या उपक्रमासाठी जालना एज्युकेशन फाउंडेशनचे प्रा. सुरेश लाहोटी यांच्याकडून प्रेरणा मिळाल्याचे त्या म्हणाल्या. अध्यक्षीय भाषणात सुनील रायठठ्ठा यांनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सुरेश अग्रवाल आणि परिवार अनेक उपक्रमांमध्ये हातभार लावत असल्याचे सांगितले. प्रत्येकाच्या जीवनात चांगला शिक्षक निश्चित येतो. त्यांचे मार्गदर्शन घेऊन उज्वल भविष्य घडवावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविकपर भाषणात प्रा. झांजरी म्हणाले की, एकल महिलांच्या पाल्यांना शालेय साहित्य वाटप करण्याबाबतचा प्रस्ताव आम्ही कलश फाउंडेशनसमोर ठेवला. त्यांनी तात्काळ होकार दर्शविल्याने दोनशे विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. पुढील वर्षीही हा उपक्रम व्यापक प्रमाणात राबविला जाईल, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रुक्मिणीकांत दीक्षित यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार अमृता धावणे यांनी मानले. कार्यक्रमाला कलश सीड्सच्या संचालिका सौ. रेखादेवी सुरेश अग्रवाल, जालना एज्युकेशन फाउंडेशनचे सचिव सुरेश कुलकर्णी, ज्येष्ठ रोटरियन सुरेश अग्रवाल, राष्ट्रीय हिंदी विद्यालयाचे मुख्याध्यापक मनीष अग्रवाल, डॉ. महेंद्र करवा, प्रा. स्वप्निल सारडा, प्रा. संतोष मुंदडा, दिलीप केंद्रे, भाग्यश्री गोमतीवाले, हेमलता पेंबार्ती, लक्ष्मी यादव, सतीश काळे, बाळासाहेब लोंढे यांच्यासह पालक आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जालना एज्युकेशन फाउंडेशन आणि कलश सीड्सच्या स्टाफने विशेष परिश्रम घेतले.

# संक्षिप्त

## राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर पुण्यतिथीनिमित्त वृक्षारोपण



तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

जालना विधानसभामतदार संघातील मौजे पिरपिंपळगाव येथे राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथी निमित्त जालना तमहानगर जिल्हाध्यक्ष भास्करराव दानवे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी सिद्धिविनायक मुळे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष भागवत बावणे, सरचिटणीस ग्रामीण तालुकाध्यक्ष, संजय डोंगरे, गणेश खरात, नितीन कानडे, सतिश जारे, विठ्ठल बरकासे तथा सर्व भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते व सर्व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तहसिलदारांना धक्काबुक्की करणाऱ्या आरोपीस पोलीसांनी ठोकल्या बेड्या

तभा वृत्तसेवा
मंठा / प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील पुर्णा नदीकाठातुन वाळु माफीयांनी हैदोस घातला होता. या वाळू माफियांच्या तक्रारी थेट तहसिलदार यांच्याकडे केल्या होत्या त्यामुळे मंठ्याचे कर्तव्यदक्ष तहसिलदार श्री. काळदाते हे माहिती मिळताच मिळालेल्या ठिकाणी कारवाई करण्यासाठी गेले असता कर्तव्यदक्ष तहसीलदार काळदाते यांच्यावर वाळू माफियांनी दिनांक १०.०८.२०२५ रोजी रात्री ०८.०० वा. ठेंगेवडगाव पाटीजवळ शिवीगाळ करत हल्ला चढवला या प्रकरणी व शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी पोलीस ठाणे मंठा येथे कर्तव्यदक्ष तहसीलदार कल्याण काळदाते यांच्या फिर्यादीवरुन साबेर सिकंदर पठाण, अबरार लकीब सय्यद, शेख शफिक नजीर या तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असुन यातील दोन आरोपींना तात्काळ अटक उर्वरीत एक आरोपी फरार असुन त्याच्या शेधकामी एक पथक नेमले आहे. पुढील तपास मा. पोलीस निरीक्षक साहेब हे करत आहेत. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक जालना अजय बन्सल साहेब, अप्पर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी परतुर विशाल खांबे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक राठोड साहेब, पोउपनि संतोष माळगे, पोकॉ/२६१ कातकडे, पोकॉ/६९२ बनकर, पोकॉ/७८८ जाधव, पोकॉ/११७९ घोडके ईत्यादी स्टाफ यांनी केली.

## जालना गणेश फेस्टीवलमध्ये आज सभा मंडप पूजन

जालना : स्व. कल्याणराव घोगरे स्टेडियममध्ये आज म्हणजे गुरुवार, दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता डॉक्टर, वकील, व्यापारी व प्रतिष्ठीत नागरीक या मान्यवरांच्या हस्ते सभा मंडपाचे भूमीपूजन होणार ऊसन यावेळी सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जालना गणेश फेस्टिवलचे अध्यक्ष अशोकराव आगलावे यांच्यासह जालना गणेश फेस्टिवलचे संस्थापक अध्यक्ष संजय लाखे पाटील यांनी केले आहे. जालना गणेश फेस्टीवलचे हे २५ वे वर्षे म्हणजे रौप्यमहोत्सवी वर्षे असुन या निमित्त बहारदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या पंचवीस वर्षात या फेस्टीवलचे नांव संपूर्ण महाराष्ट्रात झाले असून विविध आंतरराष्ट्रीय स्तरावरील कलाकार देखील येथे येऊन गेले आहे. त्याच धर्तीवर यंदाही कार्यक्रमाची रेलचेल राहणार आहे. यावेळी सर्वांसह गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन जालना गणेश फेस्टिवलचे अध्यक्ष अशोकराव आगलावे यांच्यासह जालना गणेश फेस्टिवलचे संस्थापक अध्यक्ष संजय लाखे पाटील यांच्यासह संस्थापक सदस्यांनी केले आहे.

## कुशीवर्ताबाई मुके यांचे निधन



तभा वृत्तसेवा
परतूर / प्रतिनिधी

परतूर येथील जेष्ठ नागरिक कुशीवर्ताबाई देविदासराव मुके यांचे वृद्धापकाळाने बुधवारी सकाळी निधन झाले. त्या ८२ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर डहाळेगाव ता. घनसावंगी) या त्यांच्या मुळगावी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी समाजातील सर्व स्तरातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात ३ मुले, १ मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे. त्या रमेश चांदर यांच्या बहीण व परतूर येथील सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार भाऊसाहेब मुके त्यांच्या आई होत्या.

# जालन्यात काढण्यात आली भव्य कावड यात्रा; हर–हर महादेवच्या जयघोषाने वातावरण शिवमय



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

श्रावण महिन्याच्या पावन पर्वावर अखिल भारतीय अग्रवाल महासभा आणि थाडे श्वर मंदिर भक्त मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. १०) भव्य कावड यात्रा उत्साहात पार पडली. या यात्रेत महिला, पुरुष तसेच लहानग्या बालशिवभक्तांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. संपूर्ण शहर हर–हर महादेवच्या जयघोषाने दुमदुमून गेले.

दुपारी ४ वाजता नाथ बाबा मंदिरातून यात्रेला सुरुवात झाली. नर नारायण मंदिर, बडी सडक, बालाजी गल्ली, सिंधी पंचायत मार्गे कावड यात्रा थाडेश्वर मंदिरात दाखल झाली. आकर्षक व विविधरंगी कावड सजावट, टाळ–ढोल, भजने व घोषणांनी धार्मिक वातावरण भारावून गेले.

२ ते १८ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना भेटवस्तू देण्यात आल्या. तसेच आकर्षक कावड तयार करणाऱ्यांना विशेष बक्षिसे देऊन गौरवण्यात आले. सर्वोत्कृष्ट कावड सजावटीसाठीचे प्रथम बक्षीस नील अग्रवाल, द्वितीय बक्षीस स्पर्श कामड यांना तर ५ वर्षापर्यंतच्या सहभागी बालकांसाठीचे बक्षीस सार्थक परदेसी तर महिलांमध्ये सारिका कामड, कपलचे बक्षीस अनुपम गणेश बगड़िया यांनी पटकावले. अनेक महिलांनी कावड तसेच दोन लोटा पवित्र जल घेऊन सहभाग नोंदवला. यासाठी कावड घरून तयार करून आणण्याचे आवाहन आयोजकांनी केले होते.

याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश महिला अध्यक्ष सीमा अशोक पंच, अनिता पित्ती, पूनम अग्रवाल, ज्योती अग्रवाल, शितल धानवाला, कोमल अग्रवाल, रीता भरतीया, दीपिका देवीदान, वंदना गुप्ता, चंचल अग्रवाल, प्रियांका कामड, स्वाती अग्रवाल अनूप अग्रवाल, अनुज पंच, देवराज कामड, हर्ष भरतिया, परेश गजबी, जतिन अग्रवाल, प्रवीण झंवर, कमल माधुका, अनिल लदनिया, मनोज कामड, मनोज गूडवाला, राजेश लाला, राजेश गोयल यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

श्रावण मासातील भक्तीभाव आणि ऐक्याची प्रचीती देणारी ही कावड यात्रा यशस्वीरीत्या संपन्न झाली. सहभागी भाविकांनी महादेवाचे नामस्मरण करीत पवित्र जल अर्पण केले आणि धार्मिकतेसह सामाजिक ऐक्याचा संदेश दिला.

# पिपरखेडा येथे ग्रामदरबार संपन्न



तभा वृत्तसेवा
मंठा / प्रतिनिधी

ग्रामदरबार म्हणजे शासनाच्या विविध योजना आणि सेवा लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर आयोजित केलेला एक कार्यक्रम. यात शासकीय अधिकारी लोकांच्या अडचणी ऐकतात आणि त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करतात. यावेळी आरोग्य विभागाचे वतीने जेष्ठ नागरिक आरोग्य तपासणी हृदयरोग, मधुमेह, कुष्ठरोग, क्षयरोग आदी तपासणी करण्यात आली तसेच साथीचे आजार परसणार नाहीत याची काळजी नागरिकांनी कशी करावी याचे आरोग्य शिक्षण देण्यात आले या ग्रामदरबार मध्ये अध्यक्ष म्हणून गटविकास अधिकारी पंचायत समिती मंठा श्री. गगणबोने होते तर प्रमुख पाहुणे गावाचे सरपंच श्रीमती छबाबाई विकास चव्हाण होते यावेळी आरोग्य विस्तार अधिकारी हरिभाऊ ताठे आरोग्य सहाय्यक सुजीत वाघमारे अमर झोल डॉ. दिनेश चव्हाण डॉ. मुझेफर खतीब ग्रामविकास अधिकारी प्रदिप पालवे आरोग्य कर्मचारी अशोक जावळे करण पोले धोडींबा फुपाटे श्रीमती बबीता केसकर उज्वला राठोड शिला गणकवार मोतीराम लिभुरे गजानन जाधव यांच्या सह विविध विभागाचे कर्मचारी शिक्षक आशा आदी हजर होते .

# १८ ऑगस्ट रोजी महिला लोकशाही दिनाचे आयोजन

तभा वृत्तसेवा
जालना/ प्रतिनिधी

महिला व बाल विकास विभागाने समस्या व पिडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळण्यासाठी त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या हेतूने जिल्हा तसेच तालुकास्तरावर महिलांसाठी विशेष लोकशाही दिन पाळण्यात येतो. तालुकास्तरावर प्रत्येक तहसिल कार्यालयात महिन्याच्या चौथ्या सोमवारी आणि जिल्हाधिकारी कार्यालयात दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. तरी सोमवार दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु इच्छिणाऱ्या महिलांनी आपली तक्रार दोन प्रतीमध्ये महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, जालना येथे दाखल करावी, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जालना यांनी केले आहे.

अर्ज स्वीकृतीचे निकष पुढीलप्रमाणे तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असावे, तक्रार निवेदन दोन प्रतित सादर करावे, सदरील प्रकरण न्याय प्रविष्ठ नसावे, अर्ज विहित नमुन्यात व आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करावा, सेवा व आस्थापना विषयक बाबी विचारात घेतल्या जाणार नाहीत. निवडणुक आचार संहिता काळात त्या त्या स्तरावर, विधीमंडळ अधिवेशन काळात राज्यस्तर महिला लोकशाही दिन पाळण्यात येत नाही. महिलांनी प्रथम संबंधीत तहसिलदार यांच्याकडे महिला लोकशाही दिनाच्या पंधरा दिवस आधी दोन प्रतीत तक्रार दाखल करावी. तालुका महिला लोकशाही दिनात एका महिन्यांचे आत कार्यवाही न झाल्यास संबंधीत महिला जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु शकतील.

# परतुर तालुक्यातील शेत रस्ते विषयक प्रकरणात ४० शेत रस्ते केले खुले

तभा वृत्तसेवा
परतुर / प्रतिनिधी

शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचा पुर्ण लाभ मिळवून देण्यासाठी म्हणजेचे मोठे कृषीची अवजारे ट्रॅक्टर, रोटाव्हेटर, हार्वेस्टर आदि वाहतुकीसाठी आणि शेतमालाच्या जलद व सुरळीत वाहनासाठी शेतरस्त्याबाबत मागणी व आवश्यकता, स्थानिक भौगोलिक परिस्थितीयाबाबत संबंधित सक्षम अधिकारी यांची तपासणी करुन शेत रस्त्याऐवजी किमान ३–४ मिटर (१२ फुट रुंदीचा रस्ता) रुंद असलेले शेतरस्ते उपलब्ध करुन द्यावेत, असा शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ व मामलेदार कोर्ट १९०६ चे कलम ५ अन्वये रस्त्याचे आदेश पारित करुन रस्ते खुले करण्यात आले आहेत. जालना जिल्ह्यातील परतुर तालुक्यात मागील दोन वर्षात एकुण ७६ निर्णय पारित करण्यात आले असून त्यातुन ४० रस्ते खुले करण्यात आले. तडजोडीआधारे १७ प्रकरणे निकाली काढली तर १९ प्रकरणे न्याय प्रविष्ट आहेत. यात नवीन रस्ते व रस्ता मोकळा केलेली संख्या समाविष्ट आहे. सातबारा व इतर अधिकारात नोंद घेण्यासाठी मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी यांना २१ आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती परतुरच्या तहसीलदार डॉ.प्रतिभा गोरे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

# संजीवनी हॉस्पिटलच्या माध्यमातून डॉ. बळीराम बागल यांची रुग्णसेवा उल्लेखनीय – आ. लोणीकर

## जागतिक अवयवदान दिनाचे औचित्य साधून जालना येथे आ. लोणीकर यांच्या हस्ते 'ऑर्गन रिट्रीव्हल सेंटर' चे उद्घाटन अनेक धर्म आणि संस्कृतींमध्ये अवयवदान हे एक पुण्यकर्म – आ. लोणीकर



तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

अवयवदान हे एक महत्त्वाचं आणि निस्वार्थ कृत्य आहे, ज्यामुळे गरजू व्यक्तींना नवजीवन मिळतं. यामुळे अनेक लोक वाचू शकतात आणि त्यांचं जीवन सुधारू शकतं. अवयवदानामुळे प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत असलेल्या रुग्णांना नवीन संधी मिळते. अवयवदान, विशेषतः हृदय, यकृत, मूत्रपिंड, फुफ्फुसे, आणि स्वादुपिंड यांसारख्या अवयवांचे दान, अनेक रुग्णांचे प्राण वाचवू शकते. अवयव प्रत्यारोपण रुग्णांना त्यांच्या आजारपणामुळे होणाऱ्या वेदना आणि त्रासातून आराम मिळवून देतं, ज्यामुळे त्यांचे जीवनमान सुधारते. अवयवदानामुळे गरीब आणि गरजू लोकांना वैद्यकीय सुविधा मिळण्यास मदत होते, ज्यामुळे सामाजिक समानता वाढते. असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली २०१४ च्या मंत्रिमंडळ असताना अवयव प्रत्यारोपण करणे व त्याबाबतची जनजागृती करणे यासाठी विशेष योजना तयार करण्यात आली होती. अनेक लोकांमध्ये अवयव प्रत्यारोपण करणे किंवा अवयव दान करणे या सदर्भात नागरिकांमध्ये असलेली भीती किंवा गैरसमज होते ते दूर होणे गरजेचे असून आपल्या अवयव दानाच्या निर्णयामुळे आपण किमान आठ लोकांचे प्राण वाचवू शकतो ही भावना प्रत्येकाने लक्षात ठेवणे गरजेचे आहे. त्यामुळे आपण सर्वांनी या संदर्भात अत्यंत गांभीर्यपूर्वक कुटुंबीयांना सांगून अवयव दान करणे संदर्भात फॉर्म भरून द्यावा व अवयव दानाच्या माध्यमातून जनसामान्यांचे प्राण वाचवण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन देखील यावेळी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. अवयवदान हे एक सामाजिक कृत्य आहे, ज्यामुळे समाजाला एकजूट होऊन मदतीचा हात पुढे करता येतो. अवयवदान म्हणजे एखाद्या व्यक्तीला दिलेलं नवीन जीवन. यामुळे, ज्या व्यक्तीला अवयव मिळतो, त्याला जगण्याची दुसरी संधी मिळते. काही लोकांना अवयवदानाबद्दल गैरसमज किंवा भीती असते. पण, अनेक धर्म आणि संस्कृतींमध्ये अवयवदान हे एक पुण्यकर्म मानले जाते. काही लोकांना अवयवदानामुळे स्वतःच्या शरीरावर होणाऱ्या परिणामांबद्दल भीती वाटते. पण, वैद्यकीय तंत्रज्ञान आणि सुरक्षिततेच्या उपायांमुळे, अवयवदानामुळे होणारे धोके कमी झाले आहेत. समाजात अवयवदानाबद्दल जागरूकता कमी असल्यामुळे, अनेक लोक याबद्दल माहिती नसल्यामुळे दान करण्यास तयार नसतात. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

डॉ. बळीराम बागल यांचे रुग्णसेवेचे कार्य उल्लेखनीय कोविड व त्यानंतरही संजीवनी हॉस्पिटलच्या माध्यमातून डॉ. बळीराम बागल यांचे कार्य अत्यंत उल्लेखनीय राहिले असून गोरगरिबांना मदत करणारे डॉक्टर म्हणून संपूर्ण जिल्हाभरात त्यांचा परिचय आहे. कोविड काळात हजारो रुग्णांना जीवनदान देण्याचे काम संजीवनी हॉस्पिटलच्या माध्यमातून करण्यात आले आहे. रुग्णसेवेसाठी सातत्याने प्रयत्नशील व तत्वर असणारे डॉक्टर म्हणून देखील डॉ. बागल सर्वांना सुपरिचित आहेत असेही माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले. अवयवदानाबद्दल समाजात जागरूकता निर्माण करणे खूप महत्त्वाचे आहे. लोकांना याबद्दल माहिती देऊन, त्यांना अवयवदान करण्यास प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. अवयवदान हे एक महान दान आहे, जे अनेक गरजू लोकांना नवजीवन देऊ शकते. समाजातील प्रत्येक व्यक्तीने अवयवदानाचे महत्त्व समजून घेऊन, गरजूंना मदत करण्यासाठी पुढे आले पाहिजे. असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले. यावेळी माजी आमदार राजेश टोपे, कैलास गोरंट्याल, अरविंद चव्हाण, रामेश्वर भांदर्गे, उद्योजक सुनील रायठा, रमेश भाई पटेल, साईनाथ पवार, संजीवनी हॉस्पिटलचे संचालक डॉ. बळीराम बागल, डॉ. जॉर्ज फर्नांडिस, डॉ. मिलिंद वैष्णव, डॉ. प्रवीण सूर्यवंशी, डॉ. राजेंद्र पाटील, डॉ. मिलिंद वैष्णव डॉ.अजय रोटे, कृष्णा पडुळ, शिवाजी शेजुळ, डॉ. शिवदास मिरकड, डॉ. कैलास राजगुरू, डॉ. निशांत गोयल, डॉ. शालिक जाधव, डॉ. अविनाश पौळ, डॉ. कैलास गाडेकर, सीताबाई मोहिते यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# मंजूर नियतव्ययाच्या अधीन राहून चालू वर्षाचे परिपूर्ण प्रस्ताव सादर करा

## जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या आढावा बैठकीत सूचना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ ऑगस्ट**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ अंतर्गत मंजूर नियतव्ययाच्या अधीन राहून विविध विकास योजनांचे निधी मागणीचे परिपूर्ण प्रस्ताव जीओ टॅगसह तात्काळ सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आढावा बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीस जिल्हा नियोजन अधिकारी अनिता लव्हारे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी गं. गो. चितळे, समाज कल्याणच्या सहायक आयुक्त गीता गुठ्ठे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे रमेश भडके यांच्यासह सर्व विभागप्रमुख यावेळी उपस्थित होते.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ अंतर्गत विविध विकास योजनांचे परिपूर्ण प्रस्ताव वेळेत करणार नाहीत त्यांच्यावर कारवाई करावी. ज्या यंत्रणेचे दायित्वाचे प्रस्ताव आय-पास प्रणालीवर अपलोड करुन लवकर प्राप्त होतील, त्या यंत्रणांना प्राधान्यक्रमानुसार निधी वितरीत करण्यात येईल. इमारती व रस्त्याला युनिक आयडी देण्यात येणार आहे. त्यासाठी सर्व यंत्रणांनी विविध विकास कामाचे जिओ टॅगसह प्रस्ताव सादर करावेत. आरोग्य विभागांनी ई-औषधी पोर्टलवर स्टॉक अपलोड केल्याशिवाय निधी वितरीत करण्यात येणार नाही, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी दिले.

यावेळी महावितरण, पोलीस, जिल्हा परिषद, पशुसंवर्धन विभाग, कृषि विभाग, जिल्हा आरोग्य विभाग, महिला व बालकल्याण, महिला व बालविकास विभाग, वन विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सार्वजनिक बांधकाम विभाग यासह विविध विभागांच्या प्रस्तावाबाबत चर्चा करण्यात आली. बैठकीत प्रशासनाच्या विविध विभागांना त्यांच्या जबाबदाऱ्या वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

आकांक्षीत तालुकाअंतर्गत सर्व कामाची माहिती पोर्टलवर अपडेट करावी

निती आयोगाच्या निर्देशांकानुसार आकांक्षीत तालुका हिंगोलीसाठी तयार करण्यात आलेल्या आराखड्यानुसार सर्व यंत्रणांनी वेळेत कामे पूर्ण करावेत. केलेल्या कामाची माहिती पोर्टलवर वेळोवेळी अपडेट करावी, असे निर्देशही जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी यावेळी दिले.

शासकीय कामाशी निगडीत सर्व मोजणी तात्काळ पूर्ण करावी

भूमिअभिलेख विभागाने शासकीय कामाशी निगडीत सर्व मोजणी तात्काळ पूर्ण करुन प्रलंबित प्रकरणे निकाली काढावेत. त्याचा तारीखनिहाय अहवाल सादर करावा. मोजणीनंतर हद्द निश्चितीची कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी भूमि अभिलेख विभागाच्या आढावा बैठकीत जिल्हा अधीक्षक व तालुका अधीक्षकांना दिल्या.

कालबाह्य सामग्रीचे तात्काळ निर्लेखन करावेत

प्रशासकीय इमारतीतील सर्व विभाग प्रमुखांनी कालबाह्य झालेली सामग्री, वस्तू, यंत्राचे तात्काळ निर्लेखन करुन जिल्हाधिकारी कार्यालयास अवगत करावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सर्व विभागप्रमुखाच्या बैठकीत दिले.

# जय महाकाल मंडळाची कावड यात्रा औंढा नागनाथकडे रवाना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ ऑगस्ट**

श्रावण महिन्याच्या पवित्र पर्वावर दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सेनगाव तालुक्यातील गोरेगाव येथील जय महाकाल कावड यात्रा मंडळातर्फे औंढा नागनाथ ज्योतिर्लिंगाकडे भव्य पायी कावड यात्रा काढण्यात आली. या यात्रेत गावातील १५० ते २०० युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

भक्ती आणि उत्साहाच्या वातावरणात निघालेल्या या कावड यात्रेचे भजन आणि भोजन याची व्यवस्था गोरेगाव येथील माजी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर यांच्या निवासस्थानी करण्यात आली होती. यामुळे यात्रेकरूंची उत्तम सोय झाली आणि त्यांना थोडा विसावा मिळाला. या कावड यात्रेमध्ये सहभागी झालेल्या सर्व भाविकांसाठी ही एक आनंदाची आणि उत्साहाची बाब होती.

याप्रसंगी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुनील पाटील गोरेगावकर, रणजीत पाटील गोरेगावकर, भैय्या देशमुख, नामदेवराव पवार, मदन शेळके, मदन इंगोले यांच्यासह अनेक भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मान्यवरांनी कावड यात्रेकरूंना शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या भक्तीभावाचे कौतुक केले. श्रावण महिन्यात औंढा नागनाथ ज्योतिर्लिंग येथे मोठ्या प्रमाणात कावड यात्रा येत असतात. अशातच गोरेगाव येथील या कावड यात्रेने गावातील तरुणांमध्ये धार्मिक आणि सामाजिक एकतेची भावना जागृत केली आहे. यात्रेतील उत्साह आणि शिस्तबद्ध नियोजन हे सर्वांसाठी प्रेरणादायी ठरले. या भव्य यात्रेमुळे परिसरातील वातावरण भक्तिमय झाले होते.

ही कावड यात्रा केवळ एक धार्मिक सोहळा नसून, गावातील तरुणांना एकत्र आणणारा एक महत्त्वाचा उपक्रम बनला आहे. यामुळे गावामध्ये एकोप्याची भावना वाढीस लागते, असे मत अनेक ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केले. अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे आपल्या संस्कृतीचे जतन होते आणि पुढील पिढीपर्यंत हे धार्मिक संस्कार पोहोचतात, असेही त्यांनी सांगितले.

# हिंगोलीत आज फोटोग्राफर संघटनेतर्फे कार्यशाळेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ ऑगस्ट**

हिंगोली जिल्हा प्रेस फोटोग्राफर व फोटोग्राफर असोसिएशन यांच्या वतीने १४ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध फोटोग्राफर बैजू पाटील यांच्या उपस्थितीत हिंगोली येथील शिवाजीराव देशमुख सभागृहात सकाळी दहा वाजता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

ग्रामीण भागातील फोटोग्राफर बंधूंना या क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान आणि कौशल्याची माहिती व्हावी याकरिता जागतिक फोटोग्राफर दिनानिमित्त १४ ऑगस्ट रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत वाइल्ड लाईफ व मॉडेलिंगसाठी प्रसिद्ध




असणारे फोटोग्राफर बैजू पाटील यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. सदरील कार्यशाळेचे उद्घाटन माजी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर यांच्या हस्ते करण्यात येणार असून या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार संतोष बांगर तर स्वागताध्यक्ष म्हणून युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे यांची उपस्थिती राहणार आहे. याव्यतिरिक्त सदरील कार्यक्रमास जगजीतराज खुराणा, दिलीप चव्हाण, बाबाराव बांगर, प्रकाश थोरात, राजेश जयस्वाल, अशोक अग्रवाल, युवा सेना जिल्हाप्रमुख राम कदम, मयूर कयाल यांची देखील प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सदरील कार्यक्रमाचा जास्तीत जास्त फोटोग्राफर बांधवांनी लाभ घ्यावा असे आवाहन फोटोग्राफर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुनील पाठक, जिल्हाध्यक्ष गजानन थोरात, सचिव संदीप बोरकर, कार्याध्यक्ष संतोष अर्धापूरकर, कोषध्यक्ष विजय गुंडेकर यांनी केले आहे.



**हिंगोली- गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणरायांच्या मूर्तींना रंगरंगोटी करण्यासाठी कारागीरांची लगबग सुरू झाली आहे. श्री गणेशांच्या सुंदर आणि आकर्षक मूर्ती तयार करतांना औंढा नागनाथ येथील कारागीर शिवाजी पिंपरकर गणपतीच्या मूर्तीवरून शेवटचा हात फिरवतांना दिसत आहेत. छाया- दत्तात्रय शेगुकर**

## संक्षिप्त वृत्त

### सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन

हिंगोली- राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला समान हक्क व समान संधी असा मूलभूत हक्क दिलेला आहे. त्याअंतर्गत समस्याग्रस्त व पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे. तसेच त्यांच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी किंवा तिसऱ्या सोमवारी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यानंतर येणाऱ्या कामकाजाच्या दिवशी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन राबविण्यात येतो. माहे ऑगस्ट, २०२५ च्या महिला लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, (दि. १८ ऑगस्ट) रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी त्यांच्या अडचणी मांडण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, कक्ष क्र. एस-७, हिंगोली यांच्या कार्यालयात सादर करावेत. यामध्ये न्याय प्रविष्ठ प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले, सेवा, आस्थापनाविषयक बाबी, तक्रार निवेदन वैयक्तिक स्वरुपाची नसेल असे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. समस्याग्रस्त व पीडित महिलांनी शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या व्यासपीठाचा उपयोग आपल्या अडचणी सोडविण्यासाठी करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, हिंगोली यांनी केले आहे.

### कल्याण देशमुख यांना समाजरत्न पुरस्कार जाहीर



हिंगोली- येथील सामाजिक कार्यकर्ते कल्याण देशमुख यांना नाशिकच्या दुधारे स्पोर्ट फाऊंडेशने समाजरत्न पुरस्कार जाहिर केला आहे. क्रीडा, साहित्य, आरोग्य, शिक्षण, पत्रकारीता व विविध क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरीबद्दल त्यांची निवड करण्यात आली आहे. नाशिक येथील दुधारे स्पोर्टस फाऊंउेशनच्या वतीने गेल्या दहा वर्षापासुन कै.कोंडाजी नामदेव दुधारे यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधुन राज्यातील उल्लेखनिय कामगिरी करणार्या व्यक्तींचा गौरव करण्यात येतो. यावर्षी हिंगोली येथील पत्रकारिता क्षेत्रात असलेले सामाजिक कार्यकर्ते कल्याण देशमुख यांना समाजरत्न पुरस्कारासाठी देण्यात येणार आहे. या पुरस्काराचे वितरण रविवार दि.१७ ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता नाशिक येथील श्री कालीका देवी मंदिर सभागृह जुना आग्रा रोड येथे होणार आहे. या पुरस्काराच्या निवडीचे पत्र दुधारे स्पोर्ट फाऊंडेशनच्या सरचिटणीस सौ.विजया अशोक दुधारे यांनी कल्याण देशमुख यांना पाठविले आहे. कल्याण देशमुख यांना या अगोदर केंद्र शासनाचा एक, राज्य शासनाचे बारा व विविध संघटना, सामाजिक संस्था यांचे अनेक पुरस्कार त्यांच्या सामाजिक व पत्रकारीता क्षेत्रात उल्लेखनिय कार्याबद्दल देण्यात आले आहेत. त्यांच्या निवडीबद्दल सर्वस्तरातुन अभिनंदन करण्यात येत आहे.

# कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी दोन पोलिस कर्मचारी निलंबीत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली १३ ऑगस्ट**

जिल्हाधिकारी यांच्या निवासस्थानी बंदोबस्त असतानाही चंदनाचे चोरी गेल्याप्रकरणी कर्तव्यात कसूर व निष्काळजीपणा केल्याच्या कारणावरून दोन पोलिस कर्मचाऱ्यांना तडकाफडकी निलंबीत करण्यात आले असून त्यांच्या निलंबनाचे आदेश पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दि १२ ऑगस्ट रोजी काढले.

याबाबत अधिक माहीती अशी की, हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या निवासस्थानी बंदोबस्तासाठी सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक साळुजी कपाटे व जमादार प्रकाश सोनटक्के यांची नियुक्ती करण्यात आली होती. सदर कर्मचारी कर्तव्यावर असतानाही निवासस्थानाच्या परिसरात असलेले चंदनाचे झाड चोरट्यांनी चोरून नेल्याचा प्रकार दि ११ ऑगस्ट रोजी उघडकीस आला. या प्रकरणी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता.

याप्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक माधव जिव्हारे व उपनिरीक्षक विक्रम विठुबोने यांच्या पथकाने कुरूंदा येथील दोघांना अटक केली आहे. त्यांच्याकडून चंदनाचे खोड तसेच दुचाकी जप्त करण्यात आली. सदर प्रकरण पोलिस प्रशासनाने गंभीरतेने घेतले. जिल्हाधिकारी यांच्या निवासस्थानी गार्ड ड्युटी असतांनाही चोरीची घटना होणे ही बाब अतिशय गंभीर आहे. त्यामुळे पोलिस दलाची प्रतिमा मीनी झली असून निवासस्थानात चंदनाच्या झाडाची चोरी झाली तेव्हा आपण कर्तव्यावर हजर नसल्याचे दिसून येते. आपल्याला गार्ड ड्युटीचे गांभीर्य माहीती असतांनाही त्याकडे दुर्लक्ष करण, वरिष्ठांच्या आदेशाकडे दुर्लक्ष करणे तसेच कर्तव्यात कसूर करणे, निष्काळजीपणा केल्याच्या कारणावरून सपोउपनि कपाटे व जमादार सोनटक्के यांना निलंबीत करण्यात आले आहे.

# पालक सचिव रिचा बागला यांचेकडून श्रीक्षेत्र औंढा नागनाथाचा आढावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ ऑगस्ट**

महाराष्ट्रातील प्रमुख ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्रापैकी असलेल्या श्रीक्षेत्र औंढा नागनाथच्या सर्वांगीण विकासासाठी तयार करण्यात आलेल्या आराखड्याचा वित्त विभागाच्या प्रधान सचिव तथा जिल्ह्याच्या पालक सचिव रिचा बागला यांनी ऑनलाईन बैठकीत सविस्तर आढावा घेतला.

यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता डी.जी. पोत्रे, संस्थानचे अध्यक्ष तथा तहसीलदार हरिष गाडे, जिल्हा नियोजन अधिकारी अनिता लव्हारे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी गं. गो. चितळे, भारतीय पुरातत्व विभागाचे सहायक संचालक अमोल गोटे, वास्तुविशारद प्रदीप देशपांडे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.


या बैठकीत औंढा नागनाथ परिसरातील पायाभूत सुविधा, भाविकांसाठी आवश्यक सुविधा, वाहतूक व्यवस्था, भक्त निवास, स्वच्छता, सौंदर्यीकरण, परिसर विकास तसेच पर्यावरणपूरक विकास यावर विशेष चर्चा करण्यात आली. तसेच याचा आराखडा तयार करताना जिल्हाधिकारी व सर्व संबधितांनी सोमवारी औंढा नागनाथ तीर्थक्षेत्राला भेट देवून या ठिकाणी विकास कामे करण्याबाबतचा अभ्यास करावा. तसेच देशातील व राज्यातील इतर तीर्थक्षेत्राचे अवलोकन करुन जागतिक दर्जाचे उत्तम तीर्थस्थळ बनविण्यासाठी सर्वसमावेशक विकास आराखडा तयार करावा, अशा सूचना पालक सचिव रिचा बागला यांनी दिल्या. भाविकांना अधिक चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी प्रस्तावित विकासकामांमध्ये विलंब होता कामा नये. धार्मिक, ऐतिहासिक आणि पर्यटन दृष्टिकोनातून या तीर्थक्षेत्राचा योग्य तो विकास करून औंढा नागनाथ हे जागतिक स्तरावर ओळखले जाणारे आकर्षण बनावे, यावर भर द्यावा, असे निर्देश पालक सचिव रिचा बागला यांनी यावेळी दिल्या.

तसेच विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी वेळापत्रक तयार करून प्रत्येक टप्प्यातील कामांची प्रगती सातत्याने तपासण्यात यावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

श्रीक्षेत्र औंढा नागनाथच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा प्रशासनामार्फत तयार करण्यात येणाऱ्या आराखड्याबाबत तसेच भाविक व पर्यटकांना आदर्श सुविधा देण्यासाठी काय करता येईल, याची माहिती जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी यावेळी दिली. तसेच वास्तुविशारद प्रदीप देशपांडे यांनीही औंढा नागनाथ तीर्थक्षेत्र विकासासाठी आराखड्याबाबत माहिती दिली.

# सत्यलेखचे संपादक अब्दुल हाफीज बागवान यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ ऑगस्ट**



येथील दैनिक सत्यलेखचे संपादन अब्दुल हाफीज बागवान वय ४५ यांचे दि १२ ऑगस्ट रोजी ऱ्हदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

येथील पत्रकारीता क्षेत्रात मागील २० वर्षापासून काम करणारे दैनिक सत्यलेखचे संपादक अब्दुल हाफीज बागवान यांना दि १२ ऑगस्ट रोजी छातीत दुखत असल्यामुळे त्यांना प्रथम एका खाजगी दवाखान्यात दाखल करण्यात आले परंतु प्रकृती जास्त बिघडल्यामुळे त्यांना नांदेडकडे रूग्णवाहीकेने नेत असतांना वाटेतच त्यांचा मृत्यू झाला आहे. अब्दुल हाफीज बागवान हे अत्यंत मनमिळाऊ तसेच उत्कृष्ट पत्रकार म्हणून जिल्ह्यात त्यांची ख्याती होती. अनेक साप्ताहीकांच्या संपादकांना त्यांनी मदत केली. अखील भारतीय ग्रामीण पत्रकार संघ, मराठी पत्रकार संघात त्यांनी मोठे योगदान दिले. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी काम केले. त्यांच्या निधनामुळे पत्रकारिता क्षेत्रात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पार्थिवावर दि १३ ऑगस्ट रोजी हिंगोली येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात भाऊ, पत्नी, दोन मुली, एक मुलगा असा परिवार आहे.

# राष्ट्रसंत भगवान बाबा यांची जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ ऑगस्ट**

येथील श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान यांच्यावतीने राष्ट्रसंत भगवान बाबा यांची जयंती एनटीसी मधील संत भगवान बाबा उद्यानात साजरी करण्यात आली. या जयंती प्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मेजर पंढरीनाथ घुगे ,उपाध्यक्ष एकनाथ कुटे, सहसचिव संजय बांगर, कार्यकारणी सदस्य पिंटू नागरे ,गोपाल बांगर सामाजिक कार्यकर्ते व शिवसेनेचे नेते राहुल घुगे, गणेश गंगावणे व करण राजपूत आदी उपस्थित होते.

याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना मेजर पंढरीनाथ घुगे यांनी राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जीवन कार्य विषयी माहिती देताना बाबांना जीवनात शिक्षणाचे महत्वाची जाण होती त्यामुळे पंचक्रोशीतील लोकांकडून वर्गणी, धान्य गोळा करून, डोक्यावर दगड जमा करून धौम्यगडाच्या पायथ्यासी शाळा बांधली. परिसरातील गोर-गरीब, कामगारांच्या मुलांना मोफत शिक्षण देणे सुरु केले. महात्मा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संतांच्या उपदेशाची जाण बाबांना असल्यामुळे ते कीर्तनातून एक एकर जमिन विका पण मुले शिकवा असा उपदेश करायचे. गावातील कालबाह्य झालेल्या रूढी परंपरांच्या विरोधात कृतीशील कार्य केले. डोंगर-दऱ्यातील समाज दारू, तंबाखू, बांधावरून भांडणे यापासून दूर कसा राहील याकरिता बाबा कीर्तनातून उपदेश करत. बाबांनी भगवानगड आणि पंचक्रोशीत गावोगाव नारळी साप्ताह सुरु केले. जेथे करावे कीर्तन । तेथे सेवू नये अन्न।। या तुकोक्तीप्रमाणे ते फक्त नारळ घेऊन लोकांना निर्व्यसनी रहा, आई-वडिलांची सेवा करा, शिक्षण शिका असा सरळ साधा उपदेश करीत असत असे प्रतिपादन केले.

# ग्रामीण पोलीस ठाण्यात रुजू होताच चिंचोलकरांची अवैध रेती उपसा विरोधात कारवाई

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १३ ऑगस्ट -**

पोलीस नियंत्रण कक्षात बदली झाल्यानंतर आठच दिवसात परत नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात रुजू झालेल्या पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी आज हस्सापूर रोडवरील गोदावरी नदीच्या ब्रिज जवळ अवैध रेती उपसा करणाऱ्या रेती माफियावर कारवाई करत ४३ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे यातील एका आरोपीला अटक करण्यात आली असून, अन्य दोन पाण्यात पोहुन फरार झाले.



पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांची आठ दिवसापूर्वी ग्रामीण पोलीस ठाण्यातून नियंत्रण कक्षात बदली झाली होती. मात्र जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी त्यांना सोमवारी परत ग्रामीण पोलीस ठाण्याचा पदभार घेण्याचे आदेश दिले. चिंचोलकर यांनी आज दुपारी साडेबारा वाजता हस्सापूर रोडवरील गोदावरी नदीच्या पात्रात अवैधरित्या रेती उपसा व वाहतूक करणाऱ्या माफियांची माहिती घेतली. त्यानुसार आज त्यांनी तेथे धाड टाकून हिराचंद संभाजी भोकरे रा.असर्जन यास अटक केली. त्याच्या जवळील वाहनातील हायवा क्र.एमएच-२६-बीई-४३०३ व वाळू असा ४३ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. दुसरा एक आरोपी मात्र पाण्यात पोहुण पळून जाण्यास यशस्वी झाला. पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड, माधव डफडे व अन्य सहा कर्मचाऱ्यांनी हि कारवाई यशस्वी केली. वसंत बालाजी केंद्रे यांच्या तक्रारीवरुन हिराचंद भोकरे व अन्य एकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# माहूर नगरपंचायत येथे आज ध्वजारोहण व भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १३ ऑगस्ट -**

देशभरात देशभक्तीचे वातावरण निर्माण व्हावे, राज्यस्तरापासून गावपातळीपर्यंत तिरंगामय वातावरण व्हावे, या उद्देशाने २ ते १५ ऑगस्टपर्यंत राज्यात 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्यात यावे, अशा सूचना सांस्कृतिक कार्य सचिव डॉ.किरण कुलकर्णी यांनी दिल्याप्रमाणे याला प्रतिसाद देत हर घर तिरंगा अभियानांतर्गत माहूर नगर पंचायत तर्फे कार्यालय प्रांगणात आज गुरूवार दिनांक १४ ऑगस्ट रोजी सकाळी ८:३० वाजता ध्वजारोहण व सकाळी ११:३० वाजता भव्य तिरंगा रॅली आयोजन करण्यात आले आहे.



केंद्र सरकारच्या सूचनेप्रमाणे 'हर घर तिरंगा' अभियान राज्य आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये राबविला जाणार आहे.राज्यात मागील तीन वर्षापासून 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्यात येत आहे. यावर्षीचे अभियान तीन टप्प्यात राबविण्यात येत असून, पहिला टप्पा २ ते ८ ऑगस्ट २०२५ या कालावधीत दुसरा टप्पा ९ ते १२ ऑगस्ट २०२५ तर तिसरा टप्पा १३ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

पहिला व दुसरा असे दोन टप्पे यशस्वीपणे राबविण्यात आल्यानंतर आता तिसरा टप्पा १३ ऑगस्टपासून सुरू झाला असून यात प्रत्येक घर, कार्यालय, वाहने यावर तिरंगा ध्वज फडकविण्यात येणार आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील लोकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढवा यासाठी ध्वजारोहणच्या सेल्फी काढून केंद्र शासनाच्या ,.हरीसहरींळीरपसर. ले या संकेतस्थळावर अपलोड करण्याबाबत आवाहन करण्याच्या शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाकडून देण्यात आल्या असून, याचे जोरदार स्वागत करत प्रतिसाद म्हणून माहूर नगर पंचायत कडून माहूर शहरासह संपूर्ण तालुक्यातील गावपातळीपर्यंत तिरंगामय वातावरण निर्माण व्हावे,या उद्देशाने उद्या दि.१४ ऑगस्ट रोजी नगरपंचायत प्रांगणात ध्वजारोहण व भव्य तिरंगा रॅली चे आयोजन करण्यात आले आहे.

**या गौरवशाली समयी सर्वजण एकत्र येऊ या : फिरोज दोसानी**

माहूर मधील सर्व नागरीक, पत्रकार, ज्येष्ठ नागरिक, तरूण मंडळी,समाज सेवक, पदाधिकारी सप्रेम नमस्कार.'हर घर तिरंगा अभियान' अंतर्गत माहूर नगर पंचायत तर्फे ध्वजारोहण व भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.तर! चला, हातात तिरंगा घेऊन देशभक्तीचा जल्लोष साजरा करूया. देशभक्तीपर गीते, ढोल-ताशांचा गजर, आणि देशभक्तीचा उत्साह वाढवू या.आपण सारे मिळून तिरंगा रॅलीत सहभागी होऊ या आणि एकता,बंधुता व देशभक्तीचा संदेश प्रत्येकाच्या मनामनात पोहोचवू या.या गौरवशाली समयी सर्वजण एकत्र येऊन आपल्या भारतमातेप्रती निष्ठा व अभिमान व्यक्त करू या! असे आवाहन आयोजक फिरोज दोसानी यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त

### अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या तालुका अध्यक्षपदी देविदास सूर्यवंशी



**नरसी**-नायगाव तालुक्यातील नरसी येथील रहिवासी पत्रकार कवी देविदास नागोराव सूर्यवंशी यांची सामाजिक व साहित्यिक क्षेत्रातील भरीव योगदानाची दखल घेत अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेने देविदास सूर्यवंशी यांची नायगाव तालुका अध्यक्षपदी निवड केली आहे. ही निवड ३१ डिसेंबर २०२८ पर्यंत या पदावर ते कार्यरत असतील साहित्य परिषदेचे कार्य समाजातील सर्व घटकापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या या कार्यातून सात्विक सुविचाराची पेरणी घेऊन समानतेचा मळा फुलवणार असल्याचा विश्वास परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. हे नियुक्तीपत्र अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या राष्ट्रीय उपाध्यक्षा शुभांगीताई काळभोर व राष्ट्रीय अध्यक्ष डॉ शरद गोरे यांच्या हस्ते देण्यात आले. त्यांच्या या निवडी बद्दल जेष्ठ पत्रकार सुर्यकांत सोनखेडकर, रघुनाथ सोनकांबळे, भुषण पारळकर, गंगाधर गंगासागरे, आनंदराव सुर्यवंशी, गोविंद टोकलवाड, दिलीप वाघमारे, पंडीत वाघमारे, मोरोतराव सुर्यवंशी, सय्यद अजीम व साहित्यिक, सामाजिक क्षेत्रातून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### राजीव गांधी महाविद्यालयाला मिळाले तीन सुवर्णपदकांसह एक रौप्य पदक



**मुदखेड**-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अंतरमहाविद्यालयीन क-झोन कुस्ती स्पर्धा विद्यापीठाच्या इंडोर हॉलमध्ये उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत १२ महाविद्यालयांचे एकूण ३२ कुस्तीपटू सहभागी झाले. अटीतटीच्या लढतींमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत मुदखेड येथील राजीव गांधी महाविद्यालयाने तीन सुवर्णपदक तर एक रौप्य पदक मिळवून सर्वसाधारण चॅम्पियनशिपचा मान पटकावला आहे. विजेतेपद मिळवणाऱ्या खेळाडूंमध्ये ५७ किलो वजन गट गणेश संतोष माचनवाढ सुवर्णपदक, ७४ किलो वजन गट अभिनव केशव शिंदे सुवर्णपदक, ७९ किलो वजन गट मन्मथ शिवराज मुंगडे सुवर्णपदक, ७४ किलो वजन गट अवधूत आत्माजी राहेर रौप्य पदक स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीमुळे महाविद्यालयातील चारही विजेते खेळाडू सेंट्रल झोन कुस्ती स्पर्धेसाठी निवड व सराव शिबिरासाठी पात्र ठरले. बक्षीस वितरण सोहळा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यावेळी शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सचिव डी. पी. सावंत, सहसचिव रावसाहेब शेंदारकर, कोषाध्यक्ष ॲड. उदय निंबाळकर, कार्यकारिणी सदस्य नरेंद्र चव्हाण यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले. खेळाडूंना क्रीडा विभागाचे डॉ. अर्जुनसिंग ठाकूर यांचे मार्गदर्शन लाभले, तर प्रभारी क्रीडा संचालक प्रा. प्रकाश कोथळे व डॉ. आर. एस. कोंडेकर यांनीही विशेष सहकार्य केले.

### कृषि पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करावे

**नांदेड** -सन २०२४ च्या विविध कृषि पुरस्कारासाठी शेतकरी, गट, संस्था यांनी आपले प्रस्ताव ३ प्रतीत संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयात मंगळवार २६ ऑगस्ट २०२५ रोजी सायं ६ वा. पर्यंत सादर करावेत. परिपूर्ण प्रस्तावासोबत योग्य ती कागदपत्रे, केलेले उल्लेखनिय कार्य असे सर्व दस्ताऐवजासह मार्गदर्शक सुचानेप्रमाणे विहित वेळेतच संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयात सादर करावेत. मुदतीत प्रस्ताव सादर न केल्यास अथवा प्रस्ताव परिपूर्ण नसल्यास तो ग्राह्य धरला जाणार नाही याची आवेदकाने काळजी घ्यावी. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालय किंवा सहायक कृषि अधिकारी (कृषि सहायक) किंवा उपकृषि अधिकारी (कृषि पर्यवेक्षक) किंवा मंडळ कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

# पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते ध्वजवंदन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ ऑगस्ट -**

भारताच्या ७९ वा स्वातंत्र्य दिनानिमित्त शुक्रवार १५ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाचे प्रांगणात सकाळी ९.०५ वा. राष्ट्रध्वज वंदन समारंभ होणार आहे. राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहणाचा कार्यक्रम होणार आहे. या समारंभास उपस्थित रहावे, असे आवाहन नांदेड जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

या मुख्य शासकीय कार्यक्रमास सर्वांना उपस्थित राहता यावे यासाठी इतर सर्व कार्यालय, संस्था, आदींनी त्यांचे ध्वजवंदनाचे समारंभ सकाळी ८.३५ वाजेपूर्वी किंवा ९.३५ वाजेनंतर आयोजित करावेत. सर्व निमंत्रितांनी राष्ट्रीय पोशाखात समारंभ सुरू होण्यापूर्वी २० मिनिटे अगोदर आसनस्थ व्हावे. सुरक्षिततेच्या दृष्टीने कृपया बँग सोबत आणू नये, असेही आवाहन करण्यात आले आहे.

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम, समारंभ आदी ठिकाणी राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पद्धतीबाबत शासन परिपत्रक तसेच ध्वजसंहितेतील सूचनेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. गृह विभागाच्या राष्ट्रध्वजाच्या उचित सन्मानाबाबतच्या परिपत्रकात नमूद केलेल्या निर्देशनानुसार राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिकचा वापर होणार नाही याची दक्षता संबंधितांनी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ ऑगस्ट -**

जिल्ह्यात १५ ऑगस्टचे सकाळी ६ वाजेपासून ते २९ ऑगस्ट २०२५ च्या मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात १५ ऑगस्टचे सकाळी ६ वाजेपासून ते २९ ऑगस्ट २०२५ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल.

# महाराष्ट्र आर्यवैश्य महासभेच्या वतीने भक्तनिवासाचे तिरुपतीत भूमिपूजन

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. १३ ऑगस्ट -**

महाराष्ट्र आर्यवैश्य समाजाच्या आध्यात्मिक सेवा भावाचा एक नवा अध्याय तिरुपती नगरीत सुरु होणार आहे. महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेच्या वतीने श्रीक्षेत्र तिरुपती येथे उभारण्यात येणाऱ्या भव्य भक्त निवासाच्या बांधकामाचा शुभारंभ दि.२० ऑगस्ट रोजी रोज बुधवारी सकाळी अकरा वाजता मान्य वरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

श्री सीता माँ ट्रस्ट, तिरुपती यांच्या सहकार्याने महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेस देण्यात आलेल्या एक एकर जागेचे रजिस्ट्रेशन नुकतेच राज्यसभेचे माजी खासदार टी.जी. व्यंकटेश यांच्या हस्ते, महासभेचे ज्येष्ठ पदाधिकारी विलासजी बच्चू, अध्यक्ष नंदकुमार गादेवार व महासचिव गोविंदराव बिडवई यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या ऐतिहासिक टप्प्यानंतर महासभेच्या वतीने. १०२ खोल्यांचे भव्य भक्त निवास उभारण्यात येणार असून. त्याचा भूमिपूजन सोहळा आता होत आहे.

या प्रसंगी वासू अध्यक्ष-काशी ,अन्नपूर्णा सत्रम, विलासजी बच्चू सचिव, नंदकुमार गादेवार अध्यक्ष महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा,डॉ.



सूर्यकांत शिरपेवार अध्यक्षबांधकाम समिती, या अनेक दिग्गज मान्य वरांच्या उपस्थितीत टी.जी.व्यंकटेश माजी राज्यसभा खासदार यांच्या हस्ते भूमिपूजन सोहळा संपन्न होणार आहे. या शिवाय महासभेच्या राज्य कार्यका रणी मंडळ, सल्लागार समिती, बांधकाम समिती, समन्वय समिती, माहिती व तंत्रज्ञान समिती, तसेच सर्व जिल्हाध्यक्ष, सचिव,कोषाध्यक्ष, कार्यकारी अध्यक्ष, देणगीदार, व इतर मान्यवर पदाधिकारी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

या भक्त निवासामुळे तिरुपतीस येणाऱ्या महाराष्ट्रा तील वैश्य समाजातील भाविकांना स्वच्छ, सुरक्षित आणि सुसज्ज निवासा ची उत्तम सोय उपलब्ध होणार आहे. हा उपक्रम समाजाच्या आध्यात्मिक समर्पणाचा आणि सेवा वृत्तीचा उत्तम नमुना ठरणार असून.या ऐतिहासिक सोहळ्यास मोठ्या संख्येने भाविक भक्तांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आर्यवैश्य महासभेचे महासचिव गोविंदराव बिडवई यांनी केले आहे.

# शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यासाठी महाडिबीटी पोर्टल सुरू

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १३ ऑगस्ट -**

जिल्ह्यातील सर्व शासनमान्य अनुदानित, विनाअनुदानीत, कायम विनाअनुदानीत महाविद्यालयातील सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती विद्यार्थ्यांनी शिष्यवृतीचे नवीन व नूतनीकरण अर्ज भरण्यासाठी ऑनलाईन महाडिबीटी MH-DBT पोर्टल ३० जून २०२५ पासून सुरु झाले आहे, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत समाज कल्याण सहाय्यक आयुक्त कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृती व शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना, व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता तसेच राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती तसेच स्वाधार योजना या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व शासनमान्य अनुदानित, विनाअनुदानीत, कायम विनाअनुदानीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांची आढावा बैठक नुकतीच ११ ऑगस्ट रोजी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण नांदेड येथे आयोजित करण्यात आली होती.

# मुदखेड तालुक्यात येलो मोझॅक रोगामुळे शेतकरी बांधव चिंतेत



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १३ ऑगस्ट -**

मुदखेड तालुक्यातील दरेगाववाडी येथील शेतकऱ्यांच्या सोयाबीनवर येलो मोझॅक रोगाचा प्रादुर्भाव शेतकरी चिंतेत येलो मोझॅक या विषाणूचा प्रादुर्भाव सर्व शेतकऱ्यांच्या सोयाबीन पिकांवर झाला आहे यामुळे शेतकऱ्यांचे सोयाबीन पिवळे पडणे, सोयाबीनचे पाने डागे होणे अशी लक्षणे दिसुन येत आहे.

शेतकऱ्यांनी औषध फवारणी करून सुद्धा सोयाबीन पिकांचा रोग काही जात नाही. येलो मोजॅक विषाणूमुळे दरेगाववाडी गावामधील सर्व शेतकरी चिंतेमध्ये दिसून येत आहेत. गावातील काही शेतकऱ्यांनी कृषी तालुका अधिकाऱ्यांशी संपर्क साधून येलो मोजॅक विषाणूमुळे सोयाबीन पिकाचे नुकसान झाले असल्याची माहिती दिली असता दि. १३ ऑगस्ट रोजी उप कृषी अधिकारी उप्पलवाड व सकृअ सोनकांबळे मॅडम यांनी दरेगाववाडी या गावाला भेट देऊन शेतकऱ्यांच्या पिकांची पाहणी केली व नुक्सानग्रस्त शेतकऱ्यांना शासकीय रक्कम मिळून देण्याची मागणी करणार असे त्यांनी दरेगाव वाडीतील शेतकऱ्यांना सांगितले. तसेच सोयाबीन वरिल पिवळा मोझॅक व्यवस्थापना विषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले पिवळा मोझॅक हा विषाण जन्य असून तो पांढरी माशी द्वारे उदभवतो अशी माहिती दिली.

येलो मोजॅक या विषाणूचा प्रादुर्भाव तालुक्यातील इतर गावांमध्ये सुद्धा वाढताना दिसत आहे. त्यामुळे तालूका कृषी अधिकारी यांनी पाहणी करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी तालुक्यातील शेतकरी वर्ग करीत आहेत.

यावेळी दरेगाववाडी येथील सामाजिक युवा कार्यकर्ते नितीन माने, सरपंच दीपक ककुर्ले,प्रभू बुचडे, माधव गुंडे,आकाश बुचडे, माधव डांगरे,रामचंद्र राहिरे, कचरू राहिरे,मारोती गुंडे, अरविंद बुचडे,व गावातील ज्येष्ठ नागरिक व शेतकरी बांधव उपस्थित होते.

## खंडु तोकलवाड यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. १३ ऑगस्ट -**



नायगाव तालुक्यातील टेंभुर्णी येथील रहिवासी जेष्ठ नागरिक खंडू मोतीराम तोकलवाड वय ७८ वर्ष यांच दि. १३ ऑगस्ट २०२५ रोजी बुधवारी दुपारी २:१६ वाजता दुःखद निधन झाले आहे.

स्व. खंडू तोकलवाड यांच्या पार्थिवावर दि. १४ रोजी गुरुवारी सकाळी १० वाजता टेंभुर्णी ता. नायगाव जि. नांदेड येथे अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या पश्चात तीन मुली, जावाई , नातू असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. ते अतीशय मनमिळाऊ स्वभावाचे होते.


# अंगणवाडी सेविकेची कामात कुचराई; संरपंचाची तक्रार

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. १३ ऑगस्ट -**

तालुक्यातील पारडी येथील अंगणवाडी सेविका मागील अनेक वर्षांपासून कर्तव्यावर आहेत. सदरील सेविकेची असंवैधानिक वागणूक असून कामात कुचराई केली जात आहे. सेविकेचे कर्तव्याकडे दुर्लक्ष होत असल्याने त्याचा निरागस बालक व स्तनदा मातेवर परिणाम होत आहे. अशी तक्रार खुद्द गावच्या महिला सरपंच यांनी एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे केली आहे.

लोहा तालुक्यातील पारडी येथील शारदाबाई डिकळे पारडी येथील अंगणवाडीत सेविका म्हणून कार्यरत आहेत. त्यांची अंगणवाडीतील लहान बालक व त्यांच्या पालकांशी गैरवर्तणूक करत आहेत. तसेच गावातील प्रतिष्ठीत नागरीकांनी अंगणवाडी संदर्भात विचारणा केली असता त्यांच्याशी आरेरावीची भाषा केली जाते. धमकीवजा भाषेचा वापर करुन माझे कोणीच काही करु शकत नाही अशा अविर्भाव आणला जातो. सदरील अंगणवाडी सेविका महिला असल्यामुळे त्या विनाकारण विनयभंगाची तक्रार करण्याची भाषा वापरत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अंगणवाडीतील चिमुकल्यांना खाऊ शिजविण्या ऐवजी बालकाला वैयक्तीक काम करायला लावने, आपन मोबाईल हाताळने आदीमुळे गावातील चिमुकल्यावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. त्यांच्या मोबाईलच्या अति वापरामुळे बालकांच्या व गरोदर महिला तसेच स्तनदा माता आणि किशोरवयीन मुलींच्या पोषण आहाराकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे सदरील अंगणवाडी सेविकेवर बडतर्फीची कार्यवाही करावी असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदनावर गावच्या सरपंच सुमन गोविंद डिकळे यांची स्वाक्षरी आहे.

**नांदेड** - राष्ट्रीय कार्यक्रम, महत्वाचे सांस्कृतिक कार्यक्रम आदी समारंभाच्या निमित्ताने राष्ट्रध्वजाचा वापर करताना, भारतीय राष्ट्रध्वज संहितेचे काटेकोर पालन करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत प्लास्टीकचे राष्ट्रध्वज वापरण्यात येऊ नयेत. यासाठी सर्व शासकीय यंत्रणांसह शाळा, महाविद्यालय, संस्था, संघटना आदीसह नागरीकांनी दक्ष रहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे




# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूतळा समितीच्या अध्यक्षपदी हिरे तर कार्याध्यक्षपदी राव

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. १३ ऑगस्ट -**

येथील महामानव,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर (पुतळा) स्मारक समितीच्या अध्यक्षपदी आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते एल.ए.हिरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली तर कार्याध्यक्षपदी दिलीप के. राव यांची तर सचिवपदी गौतम कसबे यांची निवड करण्यात आली आहे.

भोकर येथील मुख्य चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्यासाठी सोमवार दि.११ऑगस्ट २५ रोजी सेवानिवृत्त मुख्याध्यापक एन.के. कांबळे यांचे अध्यक्षतेखाली माऊली मंगल कार्यालयात तालुक्यातील समाज बांधवांची बैठक घेण्यात आली.भोकरच्या मुख्य चौकात १९७२ पासून डॉ. आंबेडकर पुतळ्याची नियोजित जागा आहे.या जागेवर अनेकांनी आपली दुकाने थाटून अतिक्रमण केले होते ते अतिक्रमण काढण्यासाठी दलित पँथर ते आंबेडकरी संघटनांनी आंदोलन मोर्चे केली.२०२४मध्ये नगर परिषदेने अतिक्रमण हटविले या जागेवर भव्यदिव्य पुतळा उभारावा म्हणून बैठक घेण्यात आली.बैठकीत पुतळा समिती गठीत करून कामाला लागण्याचे ठरले.प्रथम अध्यक्षपदासाठी चार ते पाच नावे पुढे आली त्यानंतर सर्वांनी माघार घेतल्यामुळे चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते एल.ए.हिरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.



सचिव पदासाठी सहा नावे पुढे आली तेंव्हा मतदान घेण्यात आले अटीतटीच्या लढतीत गौतम कसबे यांना बहुमत पडल्याने त्यांची सचिवपदी निवड झाली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा स्मारक समितीचे पदाधिकारी असे अध्यक्ष एल.ए.हिरे,कार्याध्यक्ष दिलीप के.राव,उपाध्यक्ष गोविंद गायकवाड,सुलोचना ढोले, कोषाध्यक्ष म्हणून दत्ता डोंगरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. उर्वरित सदस्य निवडण्याचे अधिकार पदाधिकाऱ्यांना देण्यात आले.

निवड झाल्यानंतर बोलतांना हिरे म्हणाले बाबासाहेबाचा पुतळा उभारणे जोक नव्हे त्यासाठी काय काय करावे लागते याची सविस्तर माहिती दिली.मी जरी अध्यक्ष असलो तरी तुम्ही सर्वच पदाधिकारी अध्यक्ष आहोत म्हणून एक दिलाने कामाला लागले पाहिजे माझा संघर्ष १९७८ नामांतर लढ्यापासून ते भुमिहीन गायरान कास्तकार, बेघरवासीय गोरगरीब लोकांवर झालेल्या अन्याय अत्याचारा विरोधात अनेक वर्ष मोर्चे आंदोलने काढण्यात गेले शेवटच्या टप्प्यात जग बदलणाऱ्या आपल्या बापाचा पुतळा उभारला पाहिजे हे स्वप्न सर्वांच्या सहकार्याने पुर्ण करायचे असल्याचे सांगितले.या बैठकीत बॅकेचे सेवानिवृत्त अधिकारी अशोक क्षिरसागर यांनी एक लाखाची देणगी जाहीर केली तर दत्ताजी डोंगरे,एन.के.कांबळे यांनी प्रत्येकी एकावन,एकावन हजार रुपये देणगी जाहीर केली.राष्ट्रपाल नारायण इंगोले यांनी ११ हजाराची देणगी जाहीर केली आहे.यावेळी भंन्ते संघशासन,डॉ.मनोज गिमेकर,मिलिंद गायकवाड,भीमराव दुधारे,सुभाष तेले यांनीही मनोगत व्यक्त केले सूत्रसंचालन राजेश चंद्रे यांनी केले तर आभार शाहिर बाबुराव गाडेकर यांनी मानले.यावेळी यावेळी जेष्ठ नेते शिवाजी पा.किन्हाळकर,बौध्द महासभेचे ता.अध्यक्ष एस.आर.जोंधळे,उत्तम एडके,अप्पाराव येरेकर,पत्रकार सिद्धार्थ जाधव,सुनिल कांबळे,अशोक जाधव,आनंद एडके,साहेबराव मोरे,गणपत कानिंदे आदिसह अनेकांची उपस्थिती होती.